।। ॐ ।।

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प - ३१**

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत

# मनोबोध व निवडक अभंग
(विवरणासह)

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

**प्रकाशक**

**स्वामीभक्त/दासरामचरणरज**

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०११

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत
मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह)

प्रकाशक :
**स्वामीभक्त/दासरामचरणरज**

प्रकाशन दिन :
**शुक्रवार दि. १५/०७/२०११**
आषाढी पौर्णिमा शके १९३३
गुरुपौर्णिमा

**प्रथम आवृत्ति, २०११**

© मा. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन

मुद्रक :
**गजेंद्र प्रिंटींग प्रेस**
पेठभाग, गुजर बोळ, सांगली.
फोन : (०२३३) २३७४३१९

प्रत मिळणेचे ठिकाण :
**दीपक चंद्रशेखर केळकर**
'श्रीराम निकेतन', ८२७, गांवभाग, सांगली ४१६ ४१६.
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८

**प्रसादमूल्य : रु.**

# अनुक्रमणिका

- श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज कृत मनोबोध विवरण ............... १
- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोधाचे श्लोक ............. ८
- निवडक अभंग प्रास्ताविक ............... १२
- सद्गुरू तारा ............... १५
- हंसावरचा राम ............... १८
- निर्गुण आत्माराम ............... २२
- अनिर्वाच्य आत्मा ............... २६
- संसार वृक्ष ............... २८
- जीव हाच ब्रह्म ............... ३१
- नरदेहाची महती ............... ३३
- कीर्तन भक्ति ............... ३५
- कीर्तनाची महती ............... ३७
- परमार्थातील ब्रह्मजन्म ............... ४०
- श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा ............... ४४

# विवरणकाराचे मनोगत

श्रीदासराममहाराज ऊर्फ श्रीदादा इ. स. १९३८ साली आजारी पडले होते. त्यावेळी डॉ. देसाई यांच्या औषधोपचाराने त्यांना बरे वाटले. त्यानंतर डॉ. देसाई यांनी त्यांना हवापालटाचा सल्ला दिला. त्या सल्यानुसार नारायण आणि हरि या दोन आतेबंधूसह श्रीदादा सातारा येथे हवापालटास गेले. तेथे असताना, एके दिवशी देहूचे तुकाराममहाराज त्यांच्या स्वप्नात आले आणि त्यांनी एक अभंग उच्चारून श्रीदादांना बोध केला. त्यानंतर ''इतर काही संतांनी आपणास बोध करावा'' अशी इच्छा श्रीदादांच्या मनात उद्‌भवली आणि ती पूर्णही झाली. त्यांच्या इच्छेनुसार काडसिद्ध, गुरुलिंगजंगमस्वामी निंबरगीकरमहाराज इत्यादि काही संतांनी श्रीदादांना बोध केला. तो श्रीदादांनी आपल्या अभंगांत व्यक्त केला. असे बोधाचे दहा अभंग झाले. त्यांना श्रीदादांनी ''सद्‌बोध दशक'' असे नाव दिले. या सद्‌बोधदशकांचे स्पष्टीकरण मजकडून पूर्वीच झाले होते. ते स्पष्टीकरण श्रीदादांचे नातू मा. दीपक केळकर यांच्या वाचनात आले. त्यांना ते आवडले. ते त्यांनी प्रकाशित करून घेतले.

श्रीदादांचे लेखन प्रकाशित करण्याच्या इच्छेने श्री. दीपक हे श्रीदादांच्या हस्तलिखित वह्या चाळीत होते. तेव्हा त्यांना असे आढळले :- श्रीदादांचे गुरुराज तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांनी श्रीदादांच्या हृदयात काही ज्ञान व बोध प्रगट केला होता आणि तो संगृहीत असणारे १२२ अभंग श्रीदादांनी रचले होते. या १२२ अभंगांचे विवरण मी करावे असे श्री. दीपक यांनी मला सुचविले. त्यांच्या सूचनेनुसार ते विवरणाचे कार्य माझ्या हातून झाले. हे विवरण त्यांनी स्वतःच श्रीगुरुराजकथित ''ज्ञान आणि बोध'' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केले.

यानंतर एकदा तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे चरित्र चाळताना श्री. दीपक यांना कोटणीसमहाराजांचे अभंग व मनोबोध हा भाग आढळला. त्यांचेही स्पष्टीकरण व्हावे असे त्यांच्या मनाने घेतले. आणि मग काही अभंग व मनोबोध यांचे विवरण मी करावे, अशी विनंति श्री. दीपक यांनी मला केली. त्यांच्या विनंतीतुसार काही अभंग व मनोबोध यांचे विवरण माझे हातून लिहून झाले. ते आज कोटणीसमहाराजांचा 'मनोबोध व निवडक अभंग' या शीर्षकाखाली प्रकाशित होत आहे. आणि हा ग्रंथही श्रीदासराम ग्रंथमालेचे पुष्प म्हणून प्रसिद्ध होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

माझ्या सर्वच लेखनामागे श्रीदादामहाराज केळकर यांचे आशीर्वाद, माझे शिक्षक श्री. शं. गो. गोखले, आणि माझे प्राध्यापक डॉ. त्रिं. गो. माईणकर यांचे प्रोत्साहन आणि पत्नी सौ. माया, पुत्र प्रा. नारायण आणि स्नुषा सौ. पद्मावती या घरच्या मंडळींचे सहकार्य आहे, हे येथे नमूद करणे आवश्यक आहे.

श्री. दीपक केळकर व या ग्रंथाचे प्रकाशक
यांना मनःपूर्वक धन्यवाद...!

**के. वा. आपटे**

## ।। श्रीराम ।।

भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे कवि साधुदास यांनी लिहिलेले चरित्र हे माझ्या कायम वाचनात असते. तसेच आपल्या संप्रदायाचा 'ग्रंथसाहेब' ज्याला म्हणतात तो 'कैवल्यवैभव' हा ग्रंथही माझ्या वाचनात असतो. या ग्रंथातील श्रीतात्यासाहेबमहाराजांनी केलेले २१ मनाचे श्लोक हे माझे पठणात असतात. हे श्लोक जर आपण बघितले तर यात महाराजांनी जनाला बोध केलेला नसून मनाला बोध केला आहे. परमार्थात मन स्थिर होणे हा श्रेष्ठतर श्रेष्ठतम अनुभव आहे असे आमचे आजोबा कीर्तनात सांगायचे व याला दृष्टांतवजा दाखला म्हणून 'अनुभवे अनुभव अवघाचि साधिला । तरीच स्थिरावला मनु ठायी ।।' हा चरण उधृत करायचे.

या २१ श्लोकांत 'दिसे तारकू तो चतुर्वक्त्र जाणा । महाविष्णू हा दंडरूपे सुजाणा। सदाशिव तो बिंदुरूपी पहावा । मना राम तो अंतरी सांठवावा ।।' हा एक श्लोक आहे. या श्लोकात महाराजांनी साधन केले असता साधकाला तारारूप, दंडरूप तसेच बिंदूरूप या पद्धतीने साक्षात्कार होतात असे सांगितले आहे. हे सर्व साक्षात्काराचे प्रकर्ष असून याची अनुभूती माझे आजोबा प.पू. श्री दासराममहाराजांनी घेतली होती. व याबाबत हे कशा प्रकारे साक्षात्कार होतात हे एक आकृति काढून दाखविले आहे. या आकृतिचा फोटो श्रीदासराममहाराज चरितामृत या ग्रंथात पा.नं. २०४ जवळ घातलेला आहे.

श्रीतात्यासाहेबमहाराजांचे कांही अभंग आमचे प.पू. श्रीअण्णांचे कीर्तनात येत असतात. असे यातील निवडक अभंग व वर नमूद केलेप्रमाणे मनाचे श्लोकांचे (मनोबोध) जर स्पष्टीकरण (विवरण) झाले तर या अभंगांचा व मनाचे श्लोकाचा अर्थ आपणास समजणे सोपे होईल असे मला वाटले. या श्लोकांचा व अभंगांचा खरा अर्थ आमचे प.पू. श्रीकेशवकाका हेच करु शकतील या खात्रीने मी आमच्या प.पू. श्रीकेशवकाका आपटे यांना या श्लोकाचे व निवडक अभंगांचे विवरण करून देणेबाबत विनंती केली. त्यांनी ही विनंती तात्काळ मान्य करून या २१ मनाचे श्लोक व निवडक १० अभंगांचा अत्यंत अभ्यासपूर्ण स्पष्टीकरण (विवरण) करुन दिले. या गोष्टीबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत. आभार मानण्याचे कारणही तसेच आहे. कारण प.पू. श्रीकेशवकाकांना सध्या ८२ वे वय सुरु असून या वयात त्यांची श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा प्रकाशित करणेबाबतची धडपड सुरु आहे. तसेच सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची असणारी 'मेमरी' अत्यंत कार्यक्षम आहे.

अशा आमच्या प.पू. श्रीकेशवकाकांनी केलेले मनोबोधाचे व निवडक अभंगांचे विवरण प्रत्येक साधकाला निश्चित उपयोगी पडेल असा माझा विश्वास आहे.

सांगली,
ज्येष्ठ शु. १० शके १९३३
प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर जयंती

**दीपक चंद्रशेखर केळकर**

### श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज कृत

## मनोबोध विवरण

मानवी जीवनात महत्त्वाचे काय आहे, असा प्रश्न आल्यास त्या प्रश्नाची भिन्नभिन्न उत्तरे मिळतील, हे उघड आहे. पण मनुष्याच्या आयुष्यात 'मन' हे अतिशय महत्त्वाचे आहे हे सर्वांना मान्य करावे लागेल यात शंका नाही. कारण 'माझे मन उतावीळ झाले,' 'माझ्या मनात येत नाही,' 'माझे मन लागत नाही,' 'मनात आले तर मी वाटेल ते करीन' अशा प्रकारचे उद्गार माणूस काढीत असतो. यावरून मनाचे महत्त्व कळण्यात अडचण नाही.

माणसाला नाक, कान, डोळे, त्वचा आणि जिव्हा अशी पाच ज्ञानेंद्रिये आहेत. या ज्ञानेंद्रियांना बाहेरच्या जगातील वस्तूंचा स्पर्श झाला की होणाऱ्या त्यांच्या संवेदना मनाप्रत पोचतात आणि त्यावर मनाच्या प्रतिक्रिया होऊन मनात बरेवाईट विचार येतात. म्हणून विचार म्हणजे संकल्पविकल्प हे मनाचे स्वरूप (संकल्पविकल्पात्मकं मनः) अशी मनाची व्याख्या केली गेली आहे. मनात येणारे हे विचार चांगले अथवा वाईट असू शकतात. चांगले-वाईट हे जरी सापेक्ष असले तरी काही चांगले आहे आणि काही वाईट आहे यात शंका नाही. चांगले विचार मनात आल्यास मनुष्य चांगली कर्मे करतो. उदा. दुसऱ्याचे चांगले करणे, परोपकार करणे, इत्यादि. याउलट वाईट विचार मनात आल्यास माणसाचे हातून दुसऱ्यावर अपकार, चोरी, हत्या इत्यादि वाईट गोष्टी होऊ शकतात. मनाच्या बऱ्यावाईट विचाराअंती होणारी कृति लक्षात घेऊन वेदाच्या 'शिवसंकल्प' नामक उपनिषदामध्ये मनात 'शिव' म्हणजे चांगले संकल्प म्हणजे विचार यावेत अशी प्रार्थना आहे.

प्रपंच आणि परमार्थ या दोहींमध्ये मन हे फार महत्त्वाचे आहे. मनात आसक्ति व अहंकार असेल तर मनुष्य प्रपंचात अडकून रहातो, हे सर्वांच्या परिचयाचे आहे. याउलट आसक्ति व अहंकार सोडून तो ईश्वरभजनी लागला तर तो प्रपंचातून मुक्तता मिळवू शकतो; असे विचारवंताच्या लक्षात आले होते. म्हणून एक उपनिषद सांगते की ''मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः। बंधाय विषयासक्तं मुक्तं निर्विषयं स्मृतम् ।।''

याचा अर्थ असा की मन हेच माणसाचा बंध आणि मोक्ष याचे कारण आहे. बंध म्हणजे कर्माअंती येणारे जन्ममरणाचे चक्र. आणि या जन्ममरणाच्या चक्ररूपी बंधातून सुटका म्हणजे मोक्ष. आसक्ति व अहंकार यांनी होणारी बरीवाईट कर्मे ही बंधनात पाडतात तर आसक्ति व अहंकाररहित मन झाल्यास ते मोक्षाप्रत नेते.

मनाचे असे महत्त्व असल्यामुळे भारतात पूर्वकाळापासून मनाचे नाव न घेता त्याला बोध, उपदेश करण्याचे प्रयत्न झाले होते. रामदासस्वामींनी स्पष्टपणे मनोबोध केला आणि मनाला बरेवाईट समजावून सांगितले. हेतु हा की मनाने वाईट सोडून द्यावे आणि चांगले पत्करावे. ज्ञानेश्वरमहाराजांनीही या मनाचे गुणदोष सांगितलेले आहेत.

सांगलीत ह.पां. ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस नावाचे एक संत होऊन गेले. त्यांनीही मनाचे संदर्भात काही श्लोक रचले आहेत. त्यांचा विचार येथे केला आहे.

भगवद्गीतेत तर अर्जुन सांगतो की मन हे अतिशय चंचल आहे. त्याचे नियंत्रण करणे अवघड आहे. त्यावर कृष्णाने सांगितले की अभ्यास व वैराग्य यांनी मनावर नियंत्रण ठेवता येते.

कोटणीसमहाराजांचे एकूण २१ श्लोक आहेत. त्यातील विषय पुढीलप्रमाणे आहेत :-

१-३, ११ या श्लोकात निर्गुण परमात्म्याचे वर्णन आहे. ८-९, १६-१७ या श्लोकांत ब्रह्मरूप रामाचे रूप वर्णिले आहे. श्लोक १२ मध्ये अनाहत नादाच्या अनुभवाचे वर्णन असून, ४-६ श्लोकांत रामाच्या साक्षात्काराचे आणि १३-१५ श्लोकांत साधकाला होणाऱ्या प्रकाशरूप साक्षात्काराचे वर्णन आहे. श्लोक ७-१० मध्ये सामान्यपणे साक्षात्काराचे वर्णन आहे तर श्लोक १८-२१ मध्ये मनाला सामान्य उपदेश आहे. या सर्व श्लोकांचा उद्देश एकच आहे की मनाने परब्रह्माकडे वळावे आणि रामाचा/ब्रह्माचा साक्षात्कार करून घेऊन, आनंदरूप मुक्तावस्थेत जावे.

येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतोः मनाला बोध करणारा कोण आहे? या प्रश्नाची दोन उत्तरे संभवतात. (१) संत-सद्गुरू मनाला उपदेश करीत आहेत.



(२) अथवा मन हेच द्विधा होते आणि त्यातील एक मन दुसऱ्या मनाला उपदेश करते. या दोन्ही उत्तरानुसार मनाला बोध केलेला दिसतो.

येथे पहिल्या वीस श्लोकात 'मना राम तो अंतरी साठवावा' असा ध्रुवपद वजा चौथा चरण आहे. त्याचा अर्थ आहेः सर्वश्रेष्ठ ईश्वर असा जो राम आहे तो हे मना तू तुझ्यामध्ये साठवून ठेव, त्याचेच स्मरण करीत रहा.

**(१) मनाला केलेला सामान्य उपदेश असा आहे :-**

अरे मना, जीवनात जरी सर्व काही बरे झाले असे वाटते तरी शेवटी ते वाईट ठरते. कारण जगातील बरे-वाईट हे सापेक्ष आहे. निरपेक्ष एकच गोष्ट आहे ती म्हणजे सर्वश्रेष्ठ ईश्वर राम. हा सर्वश्रेष्ठ राम सर्व जीवांना विसावा/शांति/समाधान देऊ शकतो. तेव्हा समाधानासाठी रामाकडे वळणे आवश्यक आहे. म्हणून हे मना, तू तुझ्यामध्ये रामाला साठवून ठेव म्हणजे तुला सतत रामाचे स्मरण होत जाईल (१८).

अरे मना, तू विक्षेप आणू नको. वाईट विचार करू नको, चांगले विचार ठेव. मनात जो राम तू साठवला आहेस त्याचे नामच वाणीने येऊ दे. तू चंचळ होऊ नको. जर तू वाणीने रामनाम घेतलेस तर डोळ्यांनी राम पहाता येईल (२१).

अरे मना, तुला उपदेश करणारा अन्य कोणी नाही. तुझाच एक भाग मी तुला सांगत आहे. मना प्रथम कुत्सित/वाईट/दुर्जन लोकांचा संग टाकावा. ''संगतिः संगदोषणम्'' या न्यायाने संगतीने माणूस चांगला होतो अगर बिघडतो. म्हणून मत्सरी, वाईट माणसांची संगत टाकून देऊन, तू चांगल्या सज्जन माणसांची, साधुसंतांची संगत धर, म्हणजे तुझे विचार चांगले होतील. मग तुझ्याकडून चांगले आचरण होईल. ईश्वरी साक्षात्कार होण्यासाठी साधुसंतांनी जे साधन सांगितले आहे ते करण्यात तू साहाय्यकारी हो (१९).

एका मनाचे हे म्हणणे ऐकल्यावर दुसऱ्या मनाने म्हटले ''ठीक आहे.'' मी तुझे ऐकीन. तेव्हा मी नक्की काय करावे ते तू मला सांग.'' त्यावर पहिले मन सांगते :- अरे मना, तू रामपायांना कधीही सोडू नको. रामनामात गोडी धारण कर. तुझा गुरु जो राम आहे त्याचे प्रेमाने भजन कर, त्याची भक्ति कर (२०).

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या गुरूंचे नाव 'रामचंद्र', 'राम' असे होते. तो उल्लेख येथे आला आहे. दुसरा 'राम' शब्द ईश्वरवाचक आहे. आणखी महत्त्वाचे असे : गुरु हा रामरूप, ब्रह्मरूप असतो (गुरु : साक्षात् परब्रह्म). त्यामुळे रामरूप सद्गुरूचे भजन करीत जावे असाही अर्थ होतो.

**(२) मनाने ब्रह्मरूप रामाचे नाम घ्यावे, रामाला मनात साठवावे, असे सांगून झाले. मग दुसऱ्या मनाने प्रश्न केला की हे ब्रह्म आहे कसे? या प्रश्नाचे उत्तर आहे : राम/ब्रह्म हे सगुणही आहे आणि निर्गुणही आहे. मग दुसरे मन विचारतेः निर्गुण ब्रह्म कसे आहे? पहिले मन त्या निर्गुण ब्रह्माचे वर्णन असे करते :-**

निर्गुण ब्रह्म हे जगातील सर्व पदार्थापेक्षा वेगळे आहे. जगातील पदार्थांना काही तरी रंग-रूप इत्यादि आहे. जगातील पदार्थ पाच अचेतन महाभूतांच्या मिश्रणांनी बनलेले आहेत. ब्रह्म/राम तसा नही :- आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी ही पाच महाभूते म्हणजे ब्रह्म नाही; ते त्यांचेपेक्षा वेगळे आहे. या पाच महाभूतांचे काही अंश म्हणजेही ब्रह्म नव्हे. या पाच भूतांचे निरनिराळे गुण आहेत. त्यातील कोणताही गुण ब्रह्मात नाही. म्हणून ते निर्गुण आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की हे ब्रह्म देहाच्या उपाधीत सापडले आहे. देहाच्या उपाधीत सापडलेल्या ब्रह्माला अंतारात्मा/प्रत्यगात्मा असे म्हणतात. हा अंतरात्माही निर्गुण आहे (१).

मानवी देहाला हात, पाय इत्यादि अवयव आहेत. निर्गुण परमात्म्याला कोणतेही अवयव नाहीत. तो निरवयव आहे. याचा अर्थ तो कायम निर्गुण असतो असे नाही; योग्यवेळी तो अवतार धारण करतो. त्या अवतारात तो साकार होतो. म्हणजे मूलतः ब्रह्म/परमात्मा निर्गुण असला तरी कारणपरत्वे तो सगुण/साकार होतो हे लक्षात ठेवावे. तेव्हा हे मना लक्षात ठेव की परमात्मा हा निर्गुण तसेच सगुण, निराकार तसाच साकार आहे (२).

जगातील पदार्थ हे 'तानापिहिनीपाजा' या सात रंगातील कोणत्या तरी रंगाचे असतात. निर्गुण परमात्म्याला कोणताही रंग नाही. पण जेव्हा तो सगुण होतो तेव्हा तो 'रंग सुरंगा बरवा' असा होतो. आणखी असे :- निर्गुण परमात्म्याला रंग नाहीत याचा एक अर्थ असा आहे की त्याचे ठिकाणी सर्वच रंग आहेत. म्हणून तो निर्गुण



म्हणजे निरंगी म्हणजे बहुरंगी/अनंतरंगी आहे असे समजून घ्यावे (३).

परमात्मा हा निर्गुण आहे त्याला कोणतेही अवयव नाहीत. तो जड नाही. जे लाकूड इत्यादिसारखे जड पदार्थ असतात ते अग्नीने जळतात, तीक्ष्ण शस्त्रांनी तुकडे होऊन पडतात, पाण्यात बुडतात. चेतन परमात्म्याला अग्नि, पाणी , वायु ही महाभूते काहीही करू शकत नाहीत. गीतेने म्हटल्याप्रमाणे ''नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः। न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूत् । (२-२३-२४). म्हणून हा आत्मा/परमात्मा नित्य आहे. तो शाश्वत आहे. तो कधीच नष्ट होणारा नाही. असा परमात्मा हे मना तू ओळखून घे (११).

ब्रह्म/राम हा सगुण तसेच निर्गुण आहे. त्याचे सगुण रूप असे आहे : राम हा मेघश्याम होता. त्याचे अंगावर मोत्याचे अलंकार होते. निळ्या आकाशात पांढरे मोती शोभतात त्याप्रमाणे निळ्या रामाच्या छातीवर मोत्यांचा हार शोभतो. जणु साधकाने आपल्या कपाळावर मोत्याचे जाळे बांधले आहे (८.२). रामाच्या अंगावर चांगली वस्त्रे आहेत (वरी अंबरी). कानात कुंडले डोलत आहेत. त्याच्या पुढे पुष्कळ कासवे आणि मासे हलत आहेत. ही कासवे आणि मासे त्याच्या खेळातील आहेत, अथवा त्याला पूर्वीचे कासव व मत्स्य अवतार आठवत आहेत (९.२). असे रामाचे रूप आहे. असे राम आपले रूप दाखवितो. त्याचे रूप पहाताच शोक/मत्सर इत्यादि विकार येत नाहीत (९.३). अशा त्या सगुण रामाचे नेहमी ध्यान करावे (८.३).

राम हा परमात्म्याचा अवतार आहे. कधी तो कृष्णाच्या रूपात दिसून येतो. कृष्ण गोकुळात असताना तो गाई चारीत असे. म्हणून गाईजवळ असणारा कृष्णरूप राम दिसतो (१६.२). कधी प्रभु राम हा रामरूपातच दिसतो. त्याच्या हातात धनुष्य असते आणि बरोबर लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न हे भाऊही असतात (१७.२). अशा रामकृष्णाचे दर्शन हा साधकाला सोहळा असतो (१६.३). राम, हे मना, आपला स्वामी आहे. अशा रामाचे कितीही स्मरण केले तरी ते कमीच आहे (१७.३).

**(३) मन जर साधकाला साधनात साहाय्यभूत झाले तर रामाचा साक्षात्कार होतो तो असाः-**

प्रकाशाचा बिंदु या रूपात राम पुढे येतो. आणि हळुहळु त्या बिंदूचा विस्तार

होऊन प्रकाश दिसतो. असाही प्रकाश सदा दिसावा असे वाटत रहाते (४.३). कधी राम हा नागरूपाने साधकाचे पुढे डोलतो तर कधी राम हा आकाशातून मोत्यांचा वर्षाव करतो. म्हणजे राम हा मोतीरंगात दिसतो. असा हा राम जो जगाचा धनी/स्वामी आहे तो साधकाने दृष्टीत साठवून ठेवावा (५.३).

कधी राम हा आकाशाच्या पोटात तेजःपुंज तारे दाखवितो. ते किती छान साजिरे गोजिरे दिसतात. हे दाखविणारा राम आहे. तो देवांचा स्वामी आहे. तो ओळखून घ्यावा (६.३).

कधी रामरूपाच्या डोळ्यात नील बिंदुप्रकाश चमचमताना दिसतो. तो साधकाला पूर्ण चंद्राप्रमाणे भासतो. असा हा सुंदर रामरूपी चंद्र पहावा (७.३).

आकाशात मोत्याच्या वेलीप्रमाणे (प्रकाश) दिसतो. ही मुक्ता-वेल म्हणजे परंज्योति (-रूप) रामाचे रूप आहे. (१०-१-२). असा हा (साक्षात्कार) सुखाचा ठेवा नेहमी मनात जपून ठेवावा (१०-३).

**(४) कधी साधकाला ईश्वराचा साक्षात्कार नादरूपाने होतो तो असाः-**

साधकाला अनाहत नाद ऐकू येतो. आघाताने नाद येतो. पण आघात न होता जो नाद होतो त्याला अनाहत म्हणतात. हा अनाहत नाद कधी तूर्य (तुरे), मोहरे, भेरी या वाद्यांच्या नादाप्रमाणे भासतो. हा अनाहत नाद साधकाने ऐकावा (१२).

**(५) कधी प्रकाशरूपाने साधकाला साक्षात्कार होतो तो असा :-**

आकाशरूपी मांडवात रत्नाचे दिवे दिसतात. त्यांचा प्रकाश कधीच बंद होत नाही. पूर्व पुण्याईने साधन जमल्यावर हा प्रकाशाचा ठेवा साधकाला लाभतो (१३).

साधकाच्या साक्षात्कारपथावर किती तरी पांढऱ्या तसेच श्याममूर्ति दिसून येतात (१४-२).

प्रकाशरूपात होणारा हा साक्षात्कार ब्रह्मा, विष्णु, महेश या रूपाने होतो, असे मानले जाते. ते असे :- तारारूपाने दिसतो तो चतुर्मुख ब्रह्मदेव आहे. प्रकाशरूप दंडाच्या स्वरूपात महाविष्णु आहे असे समजावे; प्रकाशबिंदुरूपात सदाशिव/महेश दिसतो. (१५.३).



वरीलप्रमाणे होणारा साक्षात्कार पूर्वीच्या साक्षात्कारी लोकांनी पुढीलप्रमाणे सांगून ठेवला आहे :-

प्रथमं तारकं ब्रह्म द्वितीयं दंडकम् ।
तृतीयं कुंडलाकारं चतुर्थमर्धचंद्रकम् ।।
पंचमं बिंदुसंकाशं पंच ब्रह्म सनातनम् ।।

यावरील ओवीबद्ध टीकेत असे सांगितले आहे :-

ब्रह्मा तो तारारूपे । विष्णू तो दंडरूपे ।
कुंडल रामरूपे । अर्धचंद्र ईश्वरू ।।
बिंदु सदाशिव निर्धारू । जो निजरूपे अपरंपारू ।
आणि भासे सर्पाकारू । तो शेषशाई नारायण ।।

(रामजानकी संवाद, अध्याय २)

अशा प्रकारे हे मना, साधनाचा आचार करून गुरूला डोलवावे, त्याला आनंदित करावे (१४.३). आणि ब्रह्माचा साक्षात्कार करून घेऊन, हे मना, कृतार्थ व्हावे.

■ ■ ■

## श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत
## मनोबोधाचे श्लोक

नव्हे तेज वायू नव्हे भूमि पाणी ।।
नव्हे व्योम ना अंश त्याचेचि जाणी ।।
असा निर्गुणीं अंतरात्मा पहावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।। १ ।।

नसे हात ना पाय या निर्गुणाते ।।
निराकारही मानवेना तयाते ।।
निराकार साकार ऐसा वरावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।२।।

म्हणूं शुक्ल कीं कृष्ण श्यामाभिरामा ।।
नसे पीत रंगा सुरंगासि सीमा ।।
बहूरंगि हा सज्जनीं आकळावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।३।।

पहा राम हा बिंदुरूपेंचि येतो ।।
पुढें पाहतां रुपविस्तार घेतो ।।
सदा वाटते हा पुढेंची असावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।४।।

नभीं राम मुक्ताफळे वर्षताहे ।।
झणीं नागरूपें पुढें डोलताहे ।।
जगाचा धणी दृष्टिमाजी भरावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।५।।



पहा व्योमगर्भांतरी दिव्य तारे ।।
किती दीसती शोभती गोजिरे रे ।।
सुरांचा प्रभू राम हा ओळखावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।६।।

तुझ्या नेत्रपातीं लवे नीळबिंदू ।।
कसा दीसतो साधका पूर्ण इंदू ।।
बहू लाघवी चंद्रमा हा बघावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।७।।

नभा घातलीसे गमे मुक्तजाळी ।।
बरी शोभते साधकाच्या सुभाळीं ।।
असें दाखवी रूप तो नित्य ध्यावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।८।।

बरी अंबरी कुंडलें डोलताती ।।
बहु कच्छ मत्स्यें पुढें हालताती ।।
जया पाहतांची नुरे शोक हेवा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।९।।

पहा लागली ही कशी मुक्तवेली ।।
परंज्योतिरूपे नभामाजिं ठेली ।।
असा नित्य ठेवा सुखाचा जपावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१०।।

कदा रूप हें अग्निसंगे जळेना ।।
तया तीक्ष्ण शस्त्रें कदा खंडवेना ।।
असा शाश्वतात्मा बुधें ओळखावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।११।।

तुरे मोहरे भेरि त्या वाजताती ।।
मना साधकांना बहू हर्ष देती ।।
अनूहात हा नाद त्वां आयकावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१२।।

नभोमंडपी रत्नदीपा विलोकी ।।
बुझेना प्रभा ती कदा या सुलोकीं ।।
भला लाधला साधका पूर्व ठेवा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१३।।

किती श्वेत मूर्ती किती श्याम मूर्ती ।।
स्रवों लागती साधकांच्या सुपंथी ।।
मना साधनें सद्गुरू डोलवावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१४।।

दिसे तारकू तो चतुर्वक्त्र जाणा ।।
महाविष्णू हा दंडरूपे सुजाणा ।।
सदाशिव तो बिंदुरूपी पहावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१५।।

कधीं राम हा कृष्णरूपेंचि भासे ।।
उभा राहिला धेनुपाशीं विलासे ।।
किती सोहळा साधकाचा वदावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१६।।

प्रभू राम हा रामरूपेंचि आला ।।
सवें बधुं शोभे करी चाप ल्याला ।।
असा स्वामि माझा किती आठवावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१७।।



मना जाहलें सर्व कांही बरें रे ।।
परी शेवटी जाहलें वोंखटे रे ।।
गुरू राम ठेला समस्तां विसावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१८।।

मना तुजला सांगता कोणि नाहीं ।।
मना साधनीं तूं मला साह्य होई ।।
मना संग हा कुत्सितांचा त्यजावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।१९।।

मना राम-पाया कदा तूं न सोडी ।।
मना रामनामीं धरी नित्य गोडी ।।
मना सद्गुरू राम प्रेमें भजावा ।।
मना राम तो अंतरी सांठवावा ।।२०।।

मना *दास*-चित्तास विक्षेप नाणी ।।
सदा सर्वदा राहुं दे राम वाणी ।।
असें तूं कृपेने करी बा दयाळा ।।
नको चाळवूं पाहूं दे राम डोळां ।।२१।।

■ ■ ■

# निवडक अभंग

## प्रास्ताविक

हिंदूंच्या परंपरेप्रमाणे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे मानवी जीवनाचे चार पुरुषार्थ मानले जातात. पुरुषार्थ म्हणजे मानव जीवनाचे ध्येय/प्राप्तव्य/साध्य. या चारांपैकी मोक्ष हा पुरुषार्थ महत्त्वाचा मानला गेला आहे. पूर्वकालीन ऋषी-मुनि, आणि साधु-संत यांनी सांगितले आहे की, ''जिता मुक्तीचा सोहळा'' भोगणे ही गोष्ट साधावयाची आहे. आणि म्हणूनच ''याचि देही याचि डोळा/भोगू मुक्तीचा सोहळा'' असे एका संतांनी म्हणून ठेवले आहे.

हा जो मोक्ष आहे, तो मोक्ष म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर असे दिले जातेः- या जगात माणसाला त्रिविध ताप/दुःखे भोगावी लागतात. या तीन प्रकारच्या तापांतून/त्रासांतून सुटका म्हणजे मोक्ष आहे. यावर प्रश्न असा :- मानव जीवनात दुःख का आहे? याचे उत्तर आहे : जन्म झाल्यामुळे माणसाला दुःख येते (दुःखासी कारण जन्म घ्यावा). जन्म झाला की मरण येतेच. म्हणजे जन्ममरणाअंती माणसाला दुःख भोगावे लागते. यावर पुनः प्रश्न असा :- हे जन्ममरण मनुष्याला का येते? या प्रश्नाचे उत्तर असे आहे :- आपला देह आणि बाह्य जगातील विषय/पदार्थ यांचेवर आसक्ति तसेच अहंकार बाळगून माणूस जी भलीबुरी कार्ये करतो, त्या कर्माअंती जन्ममरण मागे लागते. कर्माच्या सिद्धांताप्रमाणे, कर्माची फळे भोगण्यासाठी माणसाला जन्ममरणाचे लिगाड सोसावे लागते.

आता प्रश्न असा :- दुःखातून सुटण्यास जन्ममरणातून सुटका व्हावयास हवी. ती कशी होणार? या प्रश्नाचे उत्तर आहे :- जग निर्माण करणारा देव/ईश्वर आहे. त्या देवाचे दर्शन झाले तर जन्ममरण थांबू शकते. चिमडमहाराज सांगतात :- ''डोळां पहावे ते निजरूप। सद्गुरुकृपे आपेआप। हरती सहजी भव भय ताप। जन्ममरणाचे।।'' जीव हा मूलतः ईश्वररूप असल्याने निजरूप म्हणजे ईश्वराचे रूप. देवाचे दर्शनाने जन्ममरण, दुःख संपून आनंदाचा लाभ होतो.

ज्या देवाच्या दर्शनाने मोक्ष मिळणार आहे, तो देव कोण आहे? हिंदु धर्मात अनेक देव आहेत. ते सर्व येथे अभिप्रेत नाहीत. तर जगाचा कर्ता, धर्ता आणि हर्ता



असा जो श्रेष्ठ, परमोच्च, ''थोरला'' देव आहे, त्याचे दर्शन होणे हे महत्त्वाचे आहे. हा देव सर्व विश्व व्यापून उरलेला आहे; विश्वाच्या पलीकडेही तो आहे. हा देव अस्तित्वरूप आहे. आणि हा थोरला देव सगुणही आहे आणि निर्गुणही आहे, असे साक्षात्कारी संत सांगतात. ''सगुण निर्गुण एकु गोविंदु रे'' असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. या सगुण देवाला राम, कृष्ण, माधव, हरि, विठ्ठल इत्यादि अनेक नावे दिली जातात. तर निर्गुणाला आत्मा/परमात्मा/ब्रह्म/परब्रह्म/परमेश्वर असे म्हटले जाते.

हा थोरला देव विश्वात आहे आणि आपल्या देहातही आहे. तथापि तो आपल्या चर्मचक्षूला दिसत नाही. मग या देवाचे दर्शन होते तरी कसे? या देवाचे दर्शन होण्यास अनंत पुण्याची गरज आहे. '' देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य'' असे मामामहाराज केळकर सांगतात. हे ''थोर'' पुण्य म्हणजे अगणित, अनंत पुण्य आहे. या पुण्याची ''गणना कोण करी'' असा ज्ञानेश्वरमहाराजांचा सवाल आहे. असले अनंत पुण्य मिळविण्यास 'नाम' हे साधन संतांनी सांगितले आहे. ''रामपाठ करी'' असे मामामहाराज म्हणतात तर 'हरि मुखे म्हणा' असे ज्ञानेश्वरमहाराजांचे सांगणे आहे. या नामाच्या साधनाने जन्ममरण, दुःख संपून मोक्ष मिळत असल्याने, 'मुखी नाम हाती मोक्ष' असे घडून येते.

ज्या नामाने देवाचे दर्शन होऊन मोक्ष मिळतो ते नाम थोडे वेगळेच आहे. ''राम नाम सब कुछ कहे ठक ठाकूर और चोर। जिस नामसे प्रल्हाद ध्रुव तरे। वो नाम है कुछ और ।।'' हे जे वेगळे नाम आहे ते नाम सद्गुरू दाखवून देतात. हे नाम तत्त्वरूप, गतिरूप आहे आणि ते नाम ईश्वराने प्रत्येक माणसाला देऊन ठेवले आहे. रामदासस्वामींनी सांगितल्याप्रमाणे, हे तत्त्वरूप/गतिरूप नाम - ''नाम श्वासोच्छवासी असे.'' श्वासोच्छवासातील नाम साधन म्हणजेच 'आयुष्याचे साधन' आहे. या साधनातच ''परब्रह्म तेथे वसे'' असे असल्याने देव भेटतो, ईश्वराचे दर्शन होते, आणि जीव ईश्वराप्रमाणे सच्चिदानंद होऊन (आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे), जन्ममरणातून मुक्त होतो; तो चालू जन्मीच जीवन्मुक्त होतो.

ज्या देवाच्या दर्शनाने मोक्ष मिळणार आहे, तो देव आहे तरी कोठे? वर म्हटल्याप्रमाणे तो देव हे विश्व व्यापून आहे. ''भू-जल-तेज-समीर-रव-रवि-शशी काष्ठादिकी असे भरला.'' किंबहुना तो देव नाही कोठे असा प्रतिप्रश्न विचारता

येईल. देवाशिवाय रिता ठावच नाही. भगवद्गीतेने म्हटल्याप्रमाणे, एका अंशाने हे सर्व विश्व व्यापून तो उरलाच आहे (विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।). गुरुलिंगगीतेत म्हटल्याप्रमाणे, सत्ता/अस्तित्वरूपाने ईश्वर सर्वत्र आहे. (सद्रूपने शिव पैसावदानू ।) आता, बाह्य जगात जरी ईश्वर असला तरी तो अत्यंत सूक्ष्म असल्याने, तो आपल्या डोळ्यांना दिसू शकत नाही. तथापि आपल्या शरीरातील देव जर आपणास दिसला तर तो विश्वात कसा भरला आहे ते कळते असे साधुसंत म्हणतात. म्हणून प्रथम स्वतःच्या देहात भरलेला देव जाणून घेणे आणि त्याचे दर्शन घेणे हे आवश्यक ठरते.

श्वासोश्वासातील तत्त्वरूप/चैतन्यरूप नामाच्या साधनाने ईश्वर दिसतो. म्हणजे काय होते? आपण म्हणजे जीव देवाच्या दर्शनासाठी प्रयत्न करीत आहोत. आपण जीव हे ईश्वराचा अंश अथवा ईश्वररूप आहोत. 'देवाला पहाणारा देवच होतो' या न्यायाने जीवाने देवाला पाहिले की तो देवरूपच होऊन जातो. मग जीव-देव, जीव-ईश्वर असा भेद रहातच नाही. म्हणजे जीवाला स्वतःचे खरे मूळचे स्वरूप प्राप्त होते (जीव तो पहाता परब्रह्म जाण) म्हणून असे होते. या सर्वांचा मथितार्थ असा होतो की 'जीवाला स्वस्वरूपाची प्राप्ति' म्हणजेच मोक्ष आहे.

देहातील नाम साधनाच्या अभ्यासाने जीवाला नाद, बिंदु, कला व ज्योति या चार प्रकारांनी देवाचे/आत्म्याचे/ब्रह्माचे दर्शन होते. ''या चार प्रकाराखेरीज स्वरूपसाक्षात्कार म्हणून वेगळे काही नाही'' असे दासराममहाराज केळकर सांगतात, ते लक्षात घ्यावयास हवे.

आत्तापर्यंत वर जे जे काही विचार मांडले आहेत ते संतांनी विविध प्रकारांनी आपल्या लेखनात व्यक्त केलेले आहेत. संतांचे लेखन हे आत्मस्फूर्तीने असल्याने ते विशिष्ट पद्धतीनेच व्यक्त झाले आहे असे नाही. अनेकदा त्यांचे विचार संकीर्णपणे व्यक्त झालेले आढळून येतात.

सांगली या नगरात ह.भ. ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे महान् संत होऊन गेले. वर निर्दिष्ट केले त्यापैकी बहुतेक विषय त्यांचे अभंग व मनोबोध नामक श्लोकांत येऊन गेले आहेत. त्यांचे विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

■ ■ ■

# १

## सद्‌गुरू तारा

परमेश्वर/परब्रह्म याच्या दर्शनाविषयी चर्चा करणारे ते साक्षात्कारशास्त्र. भारतीय साक्षात्कार-शास्त्रात सद्‌गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सद्‌गुरु हा मानव रूपधारी साक्षात् ईश्वर/ब्रह्म/आत्मा आहे असे एकमुखाने म्हटले जाते (गुरुः साक्षात् परब्रह्म ।). परमार्थात प्रवेश होण्यास जशी गुरूची आवश्यकता आहे तशी परमार्थाची परमावधि होण्यास सद्‌गुरूची कृपा नितांत आवश्यक आहे. म्हणून 'एक होता गुरुकृपा । मार्ग होय अति सोपा ।।' असे म्हटलेले आहे. सद्‌गुरूविना तरणोपाय नाही. गुरु शिष्याला ईश्वराची कल्पना देतो आणि ईश्वरदर्शनाचा उपाय सांगतो. तो उपाय आचरणात आणणारा शिष्य ईश्वररूप/गुरुरूप होऊन जातो. म्हणून ईश्वराशी सदृश जसे काही नाही तसे गुरूशी सदृश काही नाही असे म्हटले जाते. परिस, चिंतामणि कामधेनु, कल्पवृक्ष हे गुरूच्या पासंगालाही येत नाहीत. गुरू शिष्याला आपल्यासारखे करून टाकतो.

रामचंद्रराव यरगट्टीकरमहाराज ऊर्फ चिमडमहाराज हे कोटणीसमहाराजांचे गुरू होते. या आपल्या ''राम'' गुरूबद्दल कोटणीसमहाराज एका पदात म्हणतात.

**लख लख ज्योति सद्‌गुरु तारा। ताऱ्यासी पाहुनी आत्म्यासी तारा ।।१।।**
**तारा तो पहावया शेषही थकला। शेषाचे मस्तकी तारा तो फुटला ।।२।।**
**तारा तो पहावया विश्वास धरा। विश्वास धरूनी विश्वासी मारा ।।३।।**
**विश्वास धरणे *श्रीरामपायी*। तारा तो लाभेल मानवदेही ।।४।।**

सद्‌गुरु हाच ब्रह्म/आत्मा आहे. आत्मा हा प्रकाशरूप आहे. म्हणून कधी कधी आत्मज्योति असा शब्द वापरला जातो. आत्म्याचा साक्षात्कार प्रकाशरूपात बिंदु, कला आणि ज्योति या स्वरूपात होतो. सद्‌गुरू हाच आत्मा असल्याने अत्यंत प्रकाशमान (लखलख) ज्योत तो आहे. किंवा लाखलाख ज्योति एकच केल्या तर जसा प्रकाश होईल तसा सद्‌गुरु आहे.

कधी सद्‌गुरू तारा/तारका रूपाने दिसतो. सद्‌गुरू हा शिष्याला तारक आहे. म्हणून तो तारा रूपाने दिसतो. तारा शब्दाने आणखी काही सूचित होते. तारा हा व्यवहारात लुकलुकताना दिसतो. ताऱ्याप्रमाणे सद्‌गुरूचे दर्शनही झिलमिल या स्वरूपात होते; कारण आत्मजोति ही झिलमिल अशी आहे. आणखी असे :- आकाशात ध्रुवाचा तारा अढळ आहे असे म्हणतात. त्या ध्रुव ताऱ्याप्रमाणे गुरुपद हे अढळ आहे.

देहाच्या उपाधीत सापडलेला जीव जन्ममरणाच्या फेऱ्यात पडलेला होता. मग त्याला सद्‌गुरूची गाठ पडली. त्याने सद्‌गुरुकथित साधन केले. त्या साधनाने त्याला आत्मरूपी सद्‌गुरूचे - ताऱ्याचे-दर्शन झाले. या दर्शनाने जन्ममरणातून सुटलेला जीव मुक्त होतो. म्हणून येथे कोटणीसमहाराज सांगतात :- जीव हो, सद्‌गुरुरूपी ताऱ्याचे दर्शन घेऊन स्वतःला तारा, म्हणजे स्वतःचा संसारसागरातून उद्‌धार करून घ्या, येथे 'आत्मा' शब्दाने जीव सूचित होतो. जीवाने सद्‌गुरुरूपी तारा पाहून स्वतःचा उद्‌धार करून घ्यावयाचा आहे.

गुरु हाच ब्रह्मदेव, विष्णु आणि महेश्वर आहे (गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु : गुरूर्देवो महेश्वरः। गुरुगीता). साहजिकच या गुरूचा, परमेश्वराचा साक्षात्कार या तीनही रूपात होतो असे सांगितले गेले आहे (दिसे तारकू तो चर्तुवक्त्र जाणा। महाविष्णु हा दंडरूपे सुजाणा । सदाशीव तो बिंदुरूपी पहावा ।। कोटणीसमहाराज). या तिघांतील विष्णु हा शेष नागाच्या शय्येवर पहुडतो, असे पुराणे सांगतात. साहजिकच दिसण्यात शेष हा मोठा आणि विष्णू लहान दिसतो. या शेषाने विष्णूचे रूप शोधण्याचा प्रयत्न केला. प्रयत्न करता करता तो थकून गेला, तरी त्याला विष्णूचे म्हणजेच गुरूचे खरे स्वरूप कळू शकले नाही. विष्णुरूपी तारा हा शेषापेक्षा श्रेष्ठ ठरला आणि तो शेषाचे मस्तकावर चमकत राहिला. असा विष्णुरूप गुरु हा शेषापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून चिमडमहाराजांनी पंचपदीमध्ये म्हटले आहे ''शेष सहस्रमुखी वर्णिता। परी तो आजवरी न होय पुरता।।'' असा विष्णुरूपी गुरु हा शेषाला सुद्‌धा अगम्य राहिला.

देह हे सद्‌गुरूचे खरे स्वरूप नव्हे. सद्‌गुरु हा साक्षात ब्रह्म आहे; ते त्याचे खरे स्वरूप आहे. आणि तसा शिष्याचा विश्वास हवा. विश्वास म्हणजे श्रद्‌धा. परमार्थात श्रद्‌धा ही अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक असंभवनीय गोष्टी श्रद्‌धेने घडून येतात असे सांगितले जाते. ख्रिश्चनांच्या बायबलमध्ये असे म्हटले आहे की श्रद्‌धा ही पर्वतालाही हालवू शकते (Faith can move mountains). म्हणून ''श्रद्‌धत्स्व सौम्य'' असे उपनिषदातील एका ऋषीने आपल्या शिष्याला सांगितले आहे. प्रकाशरूपाने साक्षात्कार होताना, सद्‌गुरू हा तारारूपाने दृश्य होतो. सद्‌गुरुरूपी ताऱ्याचे दर्शन व्हावे, असे वाटत असेल तर शिष्याची सद्‌गुरूवर निष्ठा, दृढ विश्वास, श्रद्‌धा हवी. अशा श्रद्‌धेने जर गुरुकथित साधन त्याचे हातून घडले तर त्याला सद्‌गुरुरूपी ताऱ्याचे दर्शन होते.



असा विश्वास असल्यावर, हे विश्व आणि विश्वातील विषय हे तुच्छ ठरतात. विश्व हे भासमान आहे. या भासमान विश्वातील द्रव्य, बायका, पोरे, शेतीभाती इत्यादि सर्व तुच्छ ठरते. त्यांना महत्त्व ठरत नाही. या दृष्टीने विश्वातील या सर्व गोष्टी मारावयाच्या आहेत. विश्व हे भासमान आणि म्हणूनच नाशवंत, अनित्य असल्याने, विश्वाविषयीची आसक्ति आणि अहंकार हे दूर करावयास हवेत, हे सत्य आहे.

कोटणीसमहाराज शेवटच्या चरणात सांगतात : श्रीरामपायी विश्वास धरा. कोटणीसमहाराजांच्या गुरूचे नाव 'राम' म्हणजे रामचंद्र असे होते. हे रामचंद्र यरगट्टीकर म्हणजेच चिमडमहाराज. त्यांच्यावर विश्वास ठेवा असे कोटणीसमहाराजांचे सांगणे आहे. याचा अर्थ इतकाच की प्रत्येक शिष्याचा आपऱ्या गुरूवर दृढ विश्वास हवा. या विश्वासाच्या बळावर त्याला सद्‌गुरुरूपी ताऱ्याचे दर्शन होईल. विद्यमान जन्मात जर शिष्याने श्रद्‌धापूर्वक गुरुकथित साधन आचरले तर त्याला याच देहात गुरुरूपी ताऱ्याचा साक्षात्कार होईल आणि त्याचे जीवन सुफल होईल. या नरदेहातच गुरुरूपी ईश्वराचा साक्षात्कार करून घेऊन साधकाने विद्यमान जीवनातच कृतार्थ व्हावे, असे कोटणीसमहाराजांना सांगावयाचे आहे.

■ ■ ■

## २

# हंसावरचा राम

मानवी देहात सद्गुरुरूपी देव/ईश्वर कुठे आहे, त्याच्या दर्शनाचे साधन कोणते आणि या ईश्वराचा/रामाचा साक्षात्कार काय स्वरूपात होतो, याचे दिग्दर्शन कोटणीसमहाराजांनी पुढील अभंगात केले आहे.

**हंसावरती राम बैसुनी चालिले हो पुढती ।**
**हंस कसा बघ उड्डाण करतो खाली आणि वरती ।।१।।**
**खाली येता सवे उडतसे कोण जाणे गती ।**
**प्राणी निजला तरी हंस हा न सोडी निजस्थिती ।।२।।**
**हंस गगनीच्या मुक्तामाळा देई आणूनि हाती ।**
**अगणित तारे त्यात चमकती नाना रंग ज्योती ।।३।।**
**डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही ।**
**बाप सद्गुरू कृपा करील तरी लाभ घडे देही ।।४।।**

मानवी शरीरात मस्तकातील सहस्रदलस्थानामध्ये परमात्मा/परमेश्वर आहे. त्याच्याच सत्तेने श्वासोच्छवास चालू असतो. या श्वासोच्छवासात सोहं हा नामाचा ध्वनि उमटत असतो. त्या नामाशी तद्रूप झाले असता, ''नाम तेचि रूप'' असे असल्याने परमात्म्याचा साक्षात्कार नाद, बिंदु, कला आणि ज्योति असा चार प्रकारांनी येतो.

ईश्वराचे दर्शन होण्यास 'सोहं हंस' हा उपयोगी आहे. कारण त्याच्यावरच राम बसला आहे. येथे ''हंस'' शब्दाने बाह्य जगातील हंस पक्षी अभिप्रेत नाही, हे अगदी उघड आहे. हंस हा शब्द संस्कृतमधील ''सोहं'' (=सः अहं = तो ईश्वर मी आहे) या शब्दाची अक्षरे उलट करून बनलेला आहे. तेव्हा हंसावर राम आहे याचा अर्थ सोहं मध्ये राम/ईश्वर आहे. हा सोहं ध्वनि शरीरातील श्वासोच्छवासात उमटत असतो. रामदासस्वामींनी म्हटले आहे :- श्वास आत घेतला की 'सो' असा ध्वनि



आणि श्वास बाहेर सोडला की 'हं' असा ध्वनि ऐकू येतो (धरिता सो टाकिता हं). श्वासोच्छवास मरेपर्यंत चालू असतो. म्हणून जीवन असेपर्यंत सोहं चालूच असतो. म्हणजे असे :- श्वास आत घेताना ''सो'' ध्वनिसदृश ध्वनि होतो आणि श्वास बाहेर टाकताना ''हं'' सदृश नाद येत असतो. या श्वासाची आत बाहेर एक खेप म्हणजे सोहं.

श्वास हा आत-बाहेर असा गतिरूप आहे. साहजिकच श्वासोच्छवासातील सोहं नाद/रामनामाचा नाद श्वासोच्छवासात आहे (नाम श्वासोच्छवासी असे). साहजिकच श्वासोच्छ्वासातील नाम हे गतिरूप आहे. म्हणून ''रामनाम गति देहात प्रचीती'' असे मामामहाराज केळकरांनी आपल्या रामपाठ ग्रंथात म्हटले आहे. हा सोहंचा नाद हाच रामनामाचा ध्वनि आहे आणि तो श्वासोच्छवासात आहे (रामनाम ध्वनि उमटे). या नामध्वनीकडे/सोहं ध्वनीकडे प्रयत्नपूर्वक लक्ष लावावे लागते. (''सोहं सोहं ध्वनि उमटे । तेथे लक्ष लावी नेटे'') हाच सोहं जप/नाम जप आहे. दिवसाच्या चोवीस तासात २१,६०० वेळा श्वासोच्छवास होतो, तितका जप दिवसात होतो. या जपालाच ''अजपा'' जप असे म्हणतात. (एकवीस हजार सहाशे जपा । जपोनी गेलीसे अजपा ।)

हा श्वासोच्छवासरूपी हंस वर-खाली असे उड्डाण करतो म्हणजे श्वास हा वर खाली/आंत बाहेर असा होत असतो. शरीरशास्त्रदृष्ट्या श्वासोच्छवास ही अनैच्छिक क्रिया आहे. ती रात्रंदिवस चालू असते. माणूस झोपला तरी हा श्वासोच्छ्वास चालूच असतो. येथे एक लक्षात घ्यावे :- काही प्रमाणात माणूस कमी जास्त श्वास करू शकतो. पण तो संपूर्ण बंद करणे वा सुरू करणे हे मात्र त्याच्या हातात नाही.

या श्वासोच्छवासातील नामगतीशी दृष्टि आणि श्रवण यांची एकाग्रता झाली की हळुहळु माणसाला नाद, बिंदु इत्यादि रूपाने ईश्वराचे दर्शन होऊ लागते. श्वासोच्छ्वासरूपी वायूची आणि मनाची तद्रूपता म्हणजेच पवनसिद्धि. ही पवनसिद्धि प्राप्त झाल्यावर कोणते व कसकसे अनुभव येतात हे मामामहाराज केळकरांनी आपल्या रामपाठ या ग्रंथात सांगितले आहे.

नाद, बिंदु, कला आणि ज्योति या चार स्वरूपात ईश्वराचा साक्षात्कार होतो. परंतु प्रस्तुत पदात 'नाद' च्या अनुभवाचा उल्लेख नाही; येथे फक्त प्रकाशरूपाने

येणाऱ्या अनुभवांचा उल्लेख आहे. कोटणीसमहाराजांनी आपल्या एका श्लोकात म्हटले आहे की बिंदु या स्वरुपात रामाचे दर्शन होते (पहा राम हा बिंदूरूपेचि येतो) आणि नंतर या बिंदूचाच रूपविस्तार होतो (पुढे पाहता रूपविस्तार होतो). या बिंदूचाच सिंधु होतो; सागराप्रमाणे रूपदर्शन होते. ज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'स्वरूपाचा पूर गगनासरिसा आला'' असे होते.

प्रकाशरूपाने साक्षात्कार होताना प्रकाशाचे विविध रंग आणि आकृति दिसतात. प्रस्तुत पदात मुक्तामाळा, तारा व नाना रंगाच्या ज्योति यांचा उल्लेख आहे. मुक्तामाळा म्हणजे मोत्याच्या माळेप्रमाणे प्रकाशाची आकृति, तसेच ताऱ्याप्रमाणे आकार आणि अनेकरंगी प्रकाश साधकाला दिसतात. या संदर्भात कोटणीसमहाराजांचे गुरु चिमडमहाराज सांगतात :- ''प्रथम ती तारकाकृती दिसती सुगम। पुढे नवरंगाची गर्दी दिसते परम ।।'' दुसऱ्या एका पदात चिमडमहाराज म्हणतात :- ''एक दिशेला दिसूं लागला तारा। त्यापुढे महिमा इंद्रधनु आकारा। मधी येऊनि ठेल्या मोत्यांच्या झालरा । चौफेर बांधिला नवरंगाचा फरा ।।'' प्रकाशरूप दर्शनाच्या संदर्भात वामनकाका कोटणीस सांगतात ''सुटती बाण उठती तारे चंद्र उगवला। पीत नीळ हरित रंग व्योमी शोभला ।।'' तसेच चिमडमहाराज पंचपदीतील एका पदात सांगतात :- ''नीलं धवलं श्यामं अभिनवनवरंगं ।।''

ईश्वराचे हे साक्षात्कार साधकाला आकाशात होतात. आणि ते बाह्य दृष्टीला दिसणारे नाहीत. हे साक्षात्कार शरीरातील आकाशात होतात, बाह्य भूताकाशात नाही आणि ते ''प्रज्ञाचक्षू'' ला दिसत असतात. उपनिषदे सांगतात की मानवी शरीरात भ्रूमध्याच्या वरील भागाला आकाश असे म्हणतात. पवनसिद्धि प्राप्त झाली की सहस्त्रदलस्थानापर्यंत हे साक्षात्कार होत असतात.

वरीलप्रमाणे ईश्वराचा साक्षात्कार होण्यास नामसाधन/सोहं साधन आवश्यक आहे. आणि ते साध्य होण्यास दोन गोष्टी प्रथम व्हावयास हव्यात. त्या गोष्टी पदाच्या शेवटच्या दोन ओळीत सांगितलेल्या आहेत :- (१) डोळे झाकणे. येथे बाह्य डोळे झाकून साक्षात्कार होतो असा मात्र अर्थ नाही. 'डोळे झाकणे, हे शब्द उपलक्षणेने असे दर्शवितात की डोळे, कान, इत्यादि इंद्रियांच्या बाह्य विषयांकडे जाणाऱ्या ज्या प्रवृत्ति आहेत, त्यांचा निरोध व्हावयास हवा. संक्षेपाने सांगायचे



झाल्यास इंद्रियसंयम आवश्यक आहे. इंद्रियसंयम झाला तर मनःसंयम होतो. आणि मनःसंयम झाला तर मन हे सोहंच्या नादात गुंगून जाते, तद्रूप होते. (२) परमार्थात अथपासून इतिपर्यंत गुरुकृपा ही आवश्यक आहे. आणि गुरु कथित साधन केल्याने गुरुकृपा प्राप्त होत असते.

अशा प्रकारे शरीरातील सोहं साधनेने/ नामसाधनाने गुरुकृपा होऊन, ईश्वराचे साक्षात्कार जीवाला होतात.

■ ■ ■

३

# निर्गुण आत्माराम

महाराष्ट्रातील संत हे सगुण आणि निर्गुण ब्रह्म/आत्मा/ईश्वर हे एकच मानतात आणि त्या दोहोंचेही ते स्वतंत्रपणे वर्णन करतात. कोटणीसमहाराजांनी निर्गुण ईश्वराचे वर्णन पुढील पदात केले आहे. :-

**भूमि नव्हे तो आप नव्हे तो तेज नव्हे काही।**
**वायु नव्हे आकाश नव्हे तो समूह तयाचा नाही।**
**इंद्रिय म्हणसी जरी तू त्याते नोहे इंद्रिये दाही।**
**सर्वांविरहित नाश रहित तो राम असे पाही ।।१।।**
**ऊर्ध्व नसे तो खाली नसे तो आत बाह्य काही।**
**मध्यभागी ना बाजु म्हणवेना मागे पुढे तोही।।**
**गगनापरी जो सकळ वस्तूसी व्यापुनिया राही।**
**सर्वाविरहीत नाशरहित तो राम असे पाही।।२।।**
**शुक्ल नसे तो कृष्ण नसे तो रक्त पीत काही।**
**कुब्ज नसे तो पुष्ट नसे तो ऱ्हस्व दीर्घ नाही।**
**रूप असेना वर्ण दिसेना नाव केवि साही।**
**सर्वांविरहीत नाश रहित तो राम असे पाही।।३।।**
**माता पिता नसती जयाला देव लोक कैंचे।**
**वेद यज्ञ आणि तीर्थ दिसेना स्थान मान साचे।।**
**निर्विकल्प निर्गुण निष्कल सूक्ष्म निरंजन लाही।**
**सर्वांविरहित नाश रहित तो राम दास पाही।।४।।**

''सर्वांविरहित नाश रहित तो राम'' हे शब्द ध्रुवपद वजा आलेले आहेत. त्यांचा अर्थ :- सर्वरहित म्हणजे सर्वांपेक्षा वेगळा आणि नाशरहित. सर्वरहित म्हणजे सर्वांपेक्षा वेगळा आणि नाशरहित असा तो राम आहे.



''आत्मषट्क'' नावाचा शंकराचार्यांचा एक छोटा प्रकरण ग्रंथ आहे. त्यामध्ये आत्मरूप झालेला 'मी' हा अंतःकरण, इंद्रिये, पंचभूते, पाच प्राण, पाच कोश, सात धातु, राग, द्वेष इत्यादि मानसिक विकार, चार पुरुषार्थ, पुण्य-पाप, सुख-दुःख इत्यादीपेक्षा वेगळा आहे असे म्हटले आहे. त्यातील काहीशी सादृश्य या पदात आढळते.

निर्गुण ब्रह्मावर जगाचा भास होतो अथवा सगुण ईश्वर हा विश्व निर्माण करतो. या विश्वात अनंत पदार्थ आहेत. त्याचे व पदार्थांचे अनेक गुणधर्म आहेत. त्या सर्वांपेक्षा ब्रह्म/राम वेगळा आहे. या दृष्टीने तो निर्गुण आहे. तसेच विश्व हे नाशवंत आहे; राम मात्र नाशवंत नाही. याचा अधिक खुलासा असा :- विश्व हे पाच महाभूतांनी बनलेले आहे. ही भूते म्हणजे भूमि, जल, तेज, वायु आणि आकाश. आकाशाचा गुण शब्द; शब्द आणि स्पर्श हे वायूचे गुण; शब्द, स्पर्श आणि रूप हे तेजाचे गुणधर्म; शब्द, स्पर्श, रूप आणि रस हे जलाचे गुणधर्म; तर शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पृथ्वीचे गुण होत. या पंचमहाभूतांपासून बनलेल्या विश्वातील पदार्थात हे गुण कमीजास्त प्रमाणात असतातच. ही पाच महाभूते जड/अचेतन आहेत. तर राम हा चैतन्यरूप आहे. म्हणून ही पाच भूते किंवा त्यांचा समूह म्हणजे राम नव्हे.

आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी अशी पाच सूक्ष्मभूतेही आहेत. या सूक्ष्म भूतांपासून पाच ज्ञानेंद्रिये-डोळा, नाक, कान, जीभ आणि त्वचा - आणि पाच कर्मेंद्रिये-हात, पाय, गुद, शिश्न आणि वाणी-उद्भूत होतात. ही सूक्ष्म भूते व त्यांची कार्ये हे दोन्हीही अचेतन आहेत. आत्मा-राम चेतन आहे. साहजिकच तो सूक्ष्म भूते व दहा इंद्रिये यांच्या गुणांपासून निराळा आहे; त्यांच्या गुणांनी रहित असा तो आहे.

या जगात आपण पृथ्वीतलावर रहात आहोत. म्हणून पृथ्वीच्या वर, खाली, आत, बाहेर, मध्ये, बाजू इत्यादि कल्पना आपण करतो. राम हा पृथ्वी नाही. साहजिकच पृथ्वीच्या अपेक्षेने येणारे हे शब्द पृथ्वीपेक्षा वेगळ्या असणाऱ्या रामाच्या बाबतीत संभवत नाहीत. रामाच्या बाबतीत वर, खाली इत्यादि भाषा संभवत नाही.

विश्वात सर्वत्र आकाश पसलेले आहे. ते सर्वव्यापक आहे असे म्हटले जाते. राम आणि रामाचे नाम हे ''आकाशाहुनी वाड'' आहे. आत्माराम हा सर्व काही व्यापून उरला आहे. ''भू-जल-तेज-समीर-रव-रवि-शशी-काष्ठादिकी असे भरला। अवघे स्थिरचर व्यापुनी तो हा आत्मा दशांगुले उरला'' असे म्हटले जाते. किंवा भगवद्‌गीतेने म्हटल्याप्रमाणे, ''विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।'' अशी स्थिति आहे. राम हा आकाशालाही व्यापणारा आहे.

विश्वाचा भास अथवा जन्म केव्हातरी झाला आहे. जे उत्पन्न होते ते कधीतरी नष्ट होतेच. आत्मारामाला जन्म नाही म्हणून त्याला मरणही नाही. तो स्वयंसिद्ध, स्वतःसिद्ध आहे.

विश्वातील पदार्थ नाना रंगी आहेत. राम हा त्या पदार्थांपेक्षा निराळा असल्याने त्याचे ठिकाणी कोणताच रंग नाही.

जगातील पदार्थ हे लहान, मोठे, गिड्डे, उंच, काटकुळे, लठ्ठ असे असतात. पण आत्माराम हा त्यापेक्षा वेगळा आहे. तो ''अणोः अणीयान्'' आणि ''महतो महीयान्'' आहे. तो 'अणुरेणु या थोकडा' आणि ''आकाशापेक्षा वाड'' आहे. आत्मारामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या आकाराची कल्पना करता येत नाही.

जगतील पदार्थांना काही तरी रूप म्हणजे आकार व रंग आहे. आत्माराम हा 'रूप' रहित असल्याने, त्याला रूप-आकार-रंग नाही. तसेच व्यवहारात आपण रूपाला काहीतरी नाव देत असतो. रामाला रूपच नसल्याने, तेथे नाव देण्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही. तो नाम-रूप-रहित आहे.

विश्वातील कोणताही पदार्थ म्हणजे आत्माराम नव्हे. साहजिकच त्याचे ठिकाणी देवलोक, गंधर्वलोक, नरकलोक मृत्युलोक, ब्रह्मलोक, इंद्रलोक इत्यादि काही नाही. तसेच देवलोक इत्यादींना उत्पत्ति असल्याने, त्यांचा कधीतरी नाश होतोच. आत्माराम हा स्वतःसिद्ध, अजन्मा आहे; म्हणून तो नाशरहित आहे.

या पृथ्वीवर आर्यधर्माने चार वेद सांगितले आहेत, ते म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. वेदांनी नाना प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. उदा. सोमयाग, अश्वमेघ इत्यादि. या पृथ्वीवर आपण काही तीर्थे-पवित्र जलाची स्थाने-मानतो. उदा. काशी, रामेश्वर, इत्यादि. पृथ्वीवरील काही पर्वत पवित्र मानले जातात. उदा. हिमालय. आणि त्यांची उंची इत्यादि मापे सांगतो. परंतु आत्मारामात पृथ्वीच नसल्याने पृथ्वीवरील काहीही आत्मारामात नाही.



माणसाच्या मनात नाना कल्पना येतात. पृथक्करण करून आपण वस्तूंचे अवयव पाडतो. आपण काही गोष्टी मलिन मानतो. असल्या कल्पना इत्यादि काहीही आत्मारामात नाही. म्हणून तो सर्व-रहित, विकल्प-रहित, अवयव-रहित इत्यादि आहे. तो गुणरहित, विनाशरहित आहे. तो सूक्ष्मतम आणि महत्तम आहे. तो निरंजन आहे.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास, आपणास जाणवणाऱ्या गोष्टींना जे काही गुण असतात, त्यातले कोणतेच गुण आत्मारामात नाहीत. म्हणून तो निर्गुण आहे.

■ ■ ■

## ४

# अनिर्वाच्य आत्मा

आत्माराम हा निर्गुण आहे. खरे म्हणजे त्याचे वर्णन करता येत नाही. तथापि मुमुक्षूला काहीतरी कल्पना देण्यास शब्दांचा वापर करून, त्याचेबद्दल काहीतरी सांगावे लागते. पण जे सांगितले जाते त्याने त्याच्या संपूर्ण स्वरूपाचे वर्णन झाले असे मात्र होत नाही. आता एकेक उदाहरण घेऊन, आत्माराम हा त्याप्रमाणे नाही, असे नकारात्मक शब्दांनी आत्मारामाचे वर्णन कोटणीसमहाराजांनी असे केले आहेः-

**काय वर्णू या आत्मस्वरूपा बोलवेना बाई।**
**जे जे बोलू ते तया न साजे उपमा नाही काही।।धृ।।**
**दीप म्हणू जरी तया स्वरूपा दीप नोहे बाई।**
**तेल वात काहीच नसता दीप केवि येई।।१।।**
**पुष्प म्हणू जरी तया स्वरूपा पुष्प नव्हे बाई।**
**वृक्ष पल्लव नसता तेथे पुष्प केवि होई।।२।।**
**नाग म्हणू जरी तया स्वरूपा तोही नव्हे बाई।**
**नाग मारक असती तेथे तारक हा पाही।।३।।**
**सूर्य म्हणू जी तया रूपाला सूर्य नव्हे बाई।**
**मध्यरात्रीसी या भूमंडळी सूर्य केवी येई।।४।।**
**चंद्र म्हणू जरी तया रूपाला तोही नव्हे बाई।**
**मध्यान्हकाळी चंद्र दिसला सांगे कोण पाही।।५।।**
**गुरुपुत्राविण अनुभव वचना कोण देई ग्वाही।**
**रामकृपेचा बोध दासासी धन्य धन्य होई।।६।।**

बुद्धिरूपी स्त्रीला उद्देशून येथे कोटणीसमहाराज म्हणतात :- आत्मस्वरूपाला दीप म्हणता येत नाही; कारण तेथे दिव्याला आवश्यक असणारे तेल आणि वात नाही. आत्मरूपाला फूलही म्हणता येत नाही; कारण फुलाला आवश्यक असे वृक्ष,



वेली पाने, सुगंध इत्यादि काहीही आत्मरूपात नाही. या आत्म्याला/रामाला नागही म्हणता येत नाही; कारण नाग हा विषामुळे मारक होतो. आत्मा हा मारक नसून जीवांना तारक/संसारातून तारणारा आहे. आत्म्याला सूर्यही म्हणता येत नाही. कारण मध्यरात्री या भूमंडलावर सूर्य दिसत नाही. याउलट आत्मा हा सर्वकाळी असतच असतो. आत्मा म्हणजे चंद्रही नव्हे. कारण या पृथ्वीवर चंद्र दिवसा दिसत नाही. याउलट आत्मा हा रात्रंदिवस सर्वत्र असतोच. आणखी असे :- सूर्याच्या शेकडो पट आत्म्याचे तेज आहे, पण ते शीतल आहे. आणि म्हणून आत्मा हा सूर्यही नाही आणि चंद्रही नाही.

अशाप्रकारे अन्य कितीही उदाहरणे घेतली तरी आत्मस्वरूप त्याप्रमाणे आहे असे म्हणता येत नाही.

असा बोध रामाच्या म्हणजे रामचंद्राच्या म्हणजे चिमडमहाराजांच्या कृपेने मला झाला असे कोटणीसमहाराज म्हणतात.

मग प्रश्न असा येतो :- हे आत्मस्वरूप जर कशासारखेच नाही, तर ते नाहीच काय? याचे उत्तर असे :- आत्मस्वरूप नाही असे नाही. गुरु सांगतात की आत्मा आहे. पण ते आत्म्याचे स्वरूप शब्दांनी सांगता येत नाही. पण त्या आत्मस्वरूपाचा अनुभव मात्र घेता येतो. हा अनुभव गुरुपुत्राला येतो. येथे गुरुपुत्र म्हणजे गुरूचा प्रत्यक्ष पुत्र असा अर्थ नाही. तर गुरुकथित साधन करून जो गुरूप्रमाणे सिद्ध झालेला आहे, असा साधक अभिप्रेत आहे. आणि आत्मा आहे याबद्दल तो स्वानुभवाने ग्वाही-खात्री-देऊ शकतो.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास :- आत्मस्वरूपाचे वर्णन मानवी भाषेतील शब्दांनी करता येत नाही. म्हणून आत्मा हा अनिर्वाच्य, अनिर्वचनीय म्हणजे शब्दांनी वर्णिता न येणारा असा आहे. याचा अर्थ असा नव्हे की आत्मा हा अस्तित्वातच नाही. आत्मा आहेच आहे. गुरुप्रणीत साधनप्रणालीने गुरुपुत्र या आत्म्याचा अनुभव घेऊ शकतो. याचा अर्थ आत्म्याच्या अस्तित्वाच्या बाबतीत ‘अनुभव’ हेच श्रेष्ठ प्रमाण आहे.

■ ■ ■

## ५

# संसार वृक्ष

संसार म्हणजे संसरण. संसरण म्हणजे एका जन्मातून दुसऱ्या जन्मात गमन. तेव्हा संसार म्हणजे जन्म मरणाचे चक्र अथवा रहाट गाडगे. हा संसार जीवाच्या मागे लागला आहे आणि त्यामध्ये तो सुखदुःखे भोगीत आहे. संसारात मिळणारे सुख अगदी अल्प असून दुःख मात्र अपरिमित आहे. म्हणून या संसारातून सुटून सुखरूप असा मोक्ष जीवाने प्राप्त करून घ्यावा असे साधुसंत सांगतात. तसे करताना, त्यांनी या संसारावर अरण्य, डोह, सागर, दावानल अशी अनेक रूपके केलेली आहेत, व त्यातील त्रास सांगितले आहेत.

या संसारावर भगवद्‌गीतेने अश्वत्थ वृक्षाचे रूपक केले आहे; त्याची मुळे, पाने, फुले इत्यादि सांगितली आहेत. हा संसाररूपी अश्वत्थ वृक्ष वैराग्यरूपी शस्त्राने तोडून आत्मस्वरूपाप्रत जावयाचे आहे असे गीतेचे मत आहे. या रूपकातील काही कल्पना घेऊन कोटणीसमहाराजांनी संसारावर वृक्षाचे रूपक करून असे म्हटले आहे :-

**संसार वृक्ष हा पाही। अच्छेद्य कैसा होऊनि राही ।।ध्रु।।**
**आदि मध्य आणि त्या अंतकाळी। जन्ममरण ही फळे ज्या आली ।।१।।**
**भ्रममदांची सुख शोकाची। पाने दिसती त्या वृक्षाची ।।२।।**
**पाहता त्याचे मूळ कर्माचे। बहु खोल आहे सांगतो साचे ।।३।।**
**कामक्रोधादि रिपु अनिवार। शाखा विस्तारल्या थोर ।।४।।**
**त्यावरि बसली बघ पक्षिकुळे। सुत पशु वनिता कन्येचे मेळे ।।५।।**
**असंग शस्त्राविण छेद नाही । ऐसी सज्जन देती रे ग्वाही ।।६।।**
**छेदुनि वृक्षा पटु मति होई। *दास* म्हणे नाम हरीचे गाई ।।७।।**

संसाररूपी वृक्षाचे मूळ कर्म आहे. आणि ते फार फार खोलवर गेलेले आहे. संसार म्हणजे जन्ममरण चक्र; जन्ममरणाचे कारण/मूळ कर्म आहे. ही कर्मे कितीतरी



काळापासूनची आहेत. कर्माची फळे भोगल्याशिवाय कर्म संपत नाही. (नाभुक्तं क्षीयते कर्म कल्पकोटिशतैरपि।). या कर्माची फळे भोगण्यास माणासाला पुनः पुनः जन्म घ्यावा लागतो. हा संसार केव्हापासून सुरू झाला हे सांगता येत नाही. साहजिकच ही कर्मे अतिप्राचीन काळापासूनची आहेत. या कर्मामुळे पहिल्या, मधल्या आणि शेवटल्या काळी सुद्‌धा जन्ममरण ही फळे येतच असतात. आणि या कर्मरूपी खोल आणि घट्ट मुळांमुळे हा संसारवृक्ष चांगलाच फोफावला आहे.

भ्रम, मद, शोक/दुःख, सुख ही या वृक्षाची पाने आहेत. पानामुळे वृक्ष जगतो असे म्हणतात. त्याप्रमाणे भ्रम, इत्यादि पानांनी हा वृक्ष जगत आहे. भ्रम म्हणजे भास, चुकीचे ज्ञान. मद म्हणे मस्ती, अहंकार, गर्व. सुख आणि दुःख ही पाने या वृक्षाला लगडलेली आहेत. जग हे नित्य आहे, जगात सुख आहे असा माणसाला भ्रम असतो. मी म्हणजे देह, मी सर्व काही करू शकतो असा अहंकार. आज दुःख आहे पण मला उद्या सुख मिळेल अशी माणूस अपेक्षा करतो. अशा प्रकारच्या या पानांनी हा वृक्ष घनदाट झालेला आहे; ही पाने या वृक्षाचे पोषण करीत आहेत.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे माणसाचे सहा शत्रु आहेत. तेच या वृक्षाच्या फांद्या आहेत. हे विकार नेहमीच्या मानवी जीवनात वाढत असतात आणि बळकट होत असतात. म्हणून या वृक्षाच्या शाखा भरदार आणि मजबूत होतात.

जगातील वृक्षावर पक्ष्यांचे थवे बसतात. त्याप्रमाणे माणसाच्या संसारवृक्षावर पुत्र, स्त्रिया, पशु, कन्या इत्यादींचे समूह येऊन बसतात. म्हणजे ते त्या माणसाभोवती गोळा होतात. तसेच हे पक्षी येतात व जातात. तसे माणसांच्या बाबतीत पत्नी, पुत्र, इत्यादि येत-जात असतात. पक्षी फळे खातात. तसे पत्नी, पुत्र, इत्यादि त्या माणसाच्या कष्टाची फळे भोगीत असतात.

हा संसारवृक्ष तोडण्यास कठिण आहे. याचे कारण या वृक्षात आपण गुंतलो आहोत आणि हा तोडावयाचा आहे हेच अनेकांना माहीत नसते. दिवसानुदिवस माणूस या वृक्षात अडकून बसतो; त्यातून कसे सुटावे हेच त्याला कळत नाही. हा वृक्ष तोडता येत नाही असे नाही. योग्य ते शस्त्र मिळाले तर हा संसारवृक्ष तोडून माणूस मुक्त होऊ शकतो. बाहेरचा वृक्ष तोडण्यास कुऱ्हाड इत्यादि साधने आहेत. संसारवृक्ष तोडण्यास असंगता/वैराग्य हे शस्त्र आहे. वैराग्य म्हणजे या जगातील

पदार्थापासून मनाने अलिप्त होणे. माणूस विषयांच्या आसक्तीने व अहंकाराने कर्मे करून हा वृक्ष पुनरूज्जीवित करीत असतो. ही आसक्ति संपली की संसारवृक्ष हळुहळु सुकत जातो. आणि हा वृक्ष वैराग्याने तोडण्यास मनाची तल्लख वृत्ति आवश्यक आहे. तरच अनासक्ति टिकून राहील.

वैराग्य हे शस्त्र हातात येण्यास ''हरिनाम'' हा उपाय आहे असे कोटणीसमहाराज सांगतात. हे हरिनाम म्हणजे गुरूने सांगितलेले, श्वासात असणारे, गतिरूप नाम आहे, हे लक्षात घ्यावे. या हरिनामस्मरणानेच वैराग्य येऊन हा वृक्ष तोडून, माणूस मुक्त होऊ शकतो.

■■■

# ६

# जीव हाच ब्रह्म

शंकराचार्यांच्या अद्वैत मताचे अनुसरण करणाऱ्या महाराष्ट्रातील साधुसंतांनी जीव हा मूलतः ब्रह्म आहे (जीवो ब्रह्मैव) असे सांगितले आहे. ब्रह्मरूप होणे हे जीवाचे साध्य आहे. ब्रह्माला पाहिले, ब्रह्माचा साक्षात्कार झाला, ब्रह्माला जाणले की जीव ब्रह्मरूपच होऊन जातो (ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति). म्हणून कोटणीसमहाराज एका पदात जीवाला उपदेश करतात, ''हे जीवा, तू अद्वय ब्रह्म होऊन रहा. तसे झाले की जन्मरणाचे त्रांगडे संपते आणि जीव सुखरूप होऊन जातो.'' त्यांचे हे पद असे आहे –

**अद्वय ब्रह्म तू पाही। तेचि स्वयें होऊंनि राही ।।ध्रु।।**
**जयाहूनि हा लाभ न दुसरा। ज्याहुनी सुख श्रेष्ठ नाही।**
**ज्याने पाहता पाहणे दुसरे। सांग तू मजला उरले कायी ।।१।।**
**ज्या ज्या परते रे सत्य ज्ञान। कोणते मिळविसी देही ।**
**जी वस्तु स्वये आपणचि होता। पुनर्भव या जगती नाही।।**
**निर्गुण निष्कल सूक्ष्म निरंजन । वदती अठरा चारी साही ।।**
**सद्गुरु - कृपा - मुद्रित *दास* हा । वस्तू ऐशी प्रगटचि लाही ।।**

ब्रह्म हे अंतिम सत्य तत्त्व आहे. ते सच्चिदानंद आहे. ते ब्रह्म अद्वय म्हणजे दोनरहित म्हणजे अद्वितीय आहे; ते एकमेव एक आहे. ते आनंदरूप आहे. हे जीवा, तू मुळात ब्रह्म, ब्रह्मरूप आहेस. आत्ता तुला अज्ञानाने त्या ब्रह्माचा विसर पडला आहे. तेव्हा तू आता आपले अज्ञान दूर करून, तू त्या बह्माला पहा. त्याचा साक्षात्कार करून घे. ब्रह्माला तू पाहिलेस की तू ब्रह्मरूपच होऊन जाशील. तुझे मूळचे ब्रह्मस्वरूप तुला प्राप्त होईल आणि या ब्रह्मलाभासारखा, ब्रह्मप्राप्तीसारखा दुसरा कोणताही लाभ या जगात नाही. मग मिळविण्यासारखे या जगात काही उरतच नाही. ब्रह्म होणे म्हणजे ब्रह्मानंद प्राप्त करून घेणे. ब्रह्मानंद हा सर्वश्रेष्ठ आनंद आहे. उपनिषदांनी काही आनंदाच्या पटी सांगितल्या आहेत. त्यामध्ये ब्रह्मानंद हा अत्युच्च, सर्वश्रेष्ठ असा आनंद म्हटला आहे. ब्रह्मानंदासारखे अन्य कोणतेही सुख या जगात

नाही.

या जगात नाना प्रकारची ज्ञाने आहेत. गणितज्ञान सृष्टिज्ञान, शास्त्रज्ञान इत्यादि. पण ब्रह्मज्ञानासारखे दुसरे कोणतेही ज्ञान नाही. ते मिळाल्यावर अन्य ज्ञान मिळविण्याची जरुरी रहात नाही. कारण एक ब्रह्म जाणले की सर्व काही जाणले असा अर्थ होतो, असे उपनिषदे सांगतात. (एकविज्ञानेन सर्वं विज्ञातं भवति।). ब्रह्मज्ञान झालेला माणूस सर्वज्ञानी, त्रिकालज्ञानी होतो. याच्यासारखे मग अन्य कोणते ज्ञान असेल बरे?

हे जीवा, तू एक लक्षात घे. ब्रह्मज्ञानाने तू ब्रह्म झालास की तुझा जन्ममरणाचा फेरा संपुष्टात येतो. कारण ब्रह्म हे जन्ममरणरहित आहे. माणसाला कर्माअंती पुनःपुनः जन्माला यावे लागते. ब्रह्माजवळ कर्म, धर्म, इत्यादि काही नाही. कर्म नसल्याने जन्म नाही. जन्म संपताच मरणच येत नाही. म्हणजे ब्रह्मज्ञानाने ब्रह्मरूप झाले की संसार, जन्ममरणाचा फेरा हा कायमचा संपून जातो.

हे ब्रह्म कसे आहे, असे जर, हे जीवा, तू विचारशील, तर मी सांगतो ते ऐक. चार वेद, अठरा पुराणे आणि सहा शास्त्रे असे सांगतात की ब्रह्म हे निर्गुण आहे. ब्रह्म हे सूक्ष्मात सूक्ष्म, सूक्ष्मतम (अणोः अणीयान्) आहे तसेच ते मोठ्यात मोठे आहे (महतो महीयान्). जगातील पदार्थाचे तुकडे, अवयव पाडता येतात; कारण त्यांना भाग/अवयव आहेत. जगातील पदार्थ मलिन असतात. ब्रह्म हे जगाप्रमाणे नाही. त्याला भाग नसल्याने ते निष्कल/अवयव रहित आहे. ते शुद्ध असल्याने ते निरंजन आहे. जगातील पदार्थाजवळ काहीतरी गुणधर्म असतात. ब्रह्म हे जगापेक्षा वेगळे असल्याने, जगातील कोणताही गुण, जगातील पदार्थांचा कोणताही गुणधर्म ब्रह्मामध्ये नाही. म्हणून ते निर्गुण आहे.

हे जीवा, मी सांगतो ते ध्यानात घे. मी ब्रह्म जाणणारा गुरु केला. त्यांनी ब्रह्म होण्यासाठी जे साधन सांगितले ते मी आचरणात आणले. आणि त्या साधनाच्या योगाने, माझ्यावर गुरुकृपा झाली आणि मला ब्रह्माचा साक्षात्कार झाला. मला ब्रह्मवस्तूचा लाभ झाला. आणि तसाच लाभ तूही करून घे.

हे जीवा, पुनः लक्षात घे. तू ब्रह्मरूप आहेस. ब्रह्मज्ञान झाले की जीव ब्रह्मरूप, ब्रह्मानंदरूप होतो. या ब्रह्मज्ञानाइतके, या ब्रह्मसाक्षात्काराइतके, या ब्रह्मानंदाइतके श्रेष्ठ या जगात अन्य काही नाही. तुझे मूळचे स्वरूप ब्रह्मच आहे. तेव्हा तू तुझे मूळचे ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घे आणि सततचा सुखी हो.

■ ■ ■

# ७

## नरदेहाची महती

जीवाचे मूळ रूप ब्रह्म हेच आहे. तथापि सध्या त्याला ते कळत नाही; कारण तो देहाच्या उपाधीत आहे. देहाला तो मी म्हणत आहे. या अज्ञानाने त्याला स्वतःच्या मूळ रूपाचा विसर पडला आहे. त्यामुळे तो या जगात सुखदुःखाच्या जंजाळात अडकून बसला आहे. परंतु देहाच्या उपाधीत असण्याचा एक फायदा असा आहे की या देहात असतानाच जर जीवाने एकादा ब्रह्मसाक्षात्कारी गुरु केला, आणि त्याने गुरु-प्रणीत साधनाचा आचार केला, तर तो ब्रह्मरूप होऊन जातो. या देहात असतानाच त्याला ब्रह्माचे दर्शन निरनिराळ्या प्रकाश-स्वरूपात होते. अशी नरदेहाची महती सांगताना कोटणीसमहाराज म्हणतात :-

**जववरी सद्‌गुरु प्रसन्न नाही । मातीची महती न कळे ग बाई।।ध्रु।।**
**मातीत माणिक चमकत पाही । माणिक न कळता व्यर्थ जन्म बाई।।१।।**
**मातीत हिंरे लखलखती पाही । हिंरे न कळता व्यर्थ जन्म बाई ।।२।।**
**मातीत मोती झळकती पाही । मोती न कळता व्यर्थ जन्म बाई ।।३।।**
**मातीत मोहन माळ गे पाही । माळ न कळता व्यर्थ जन्म बाई ।।४।।**
**मातीत चांदणी झमकत पाही । चांदणी न कळता व्यर्थ जन्म बाई ।।५।।**
**गुरुनाम स्कंधी वाहूनि पाही । *हनुमंत* मातीत नाचतो बाई ।।६।।**

मानवी जीवनात बुद्‌धि ही महत्त्वाची आहे. बुद्‌धि जसा निश्चय करेल तसे माणूस करतो. नरदेहात आल्यावर ब्रह्मरूप होणे हे महत्त्वाचे आहे हे कळले तर बुद्‌धि तसा निश्चय करील. हे माहीत असल्याने कोटणीसमहाराज बुद्‌धिरूपी स्त्रीला या पदात नरदेहाचे महत्त्व सांगत आहेत.

देह हा घातक तसेच तारकही आहे. देह म्हणजे मी असे मानले तर तो देह घातक होऊन जीवाला जन्ममरणाच्या कचाट्यात पाडतो. याउलट जीवाने ब्रह्म/परमेश्वर होण्याचे साधन या देहातच ठेवले आहे हे जर सद्‌गुरूकडून कळले आणि साधन जर जीवाने केले तर जीवाला ब्रह्माचे दर्शन/साक्षात्कार भिन्न भिन्न प्रकारांनी होऊन, देह हा तारक ठरतो.

देह हा आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी या पाच महाभूतांच्या विशिष्ट मिश्रणाने बनलेला आहे. त्यामध्ये पृथ्वीचे म्हणजेच मातीचे प्रमाण जास्त आहे. म्हणून त्याला या पदात ''माती'' असे म्हटले आहे. या मातीची महती सर्वसाधारणपणे कळत नाही. पण गुरु ती सांगतात. गुरूच्या मतानुसार या मातीतच/देहातच ब्रह्माचा साक्षात्कार विविध प्रकारांनी होतो, तो या पदात सांगितला आहे.

ब्रह्माचा/परमेश्वराचा साक्षात्कार नाद, बिंदु, कला व ज्योति या चार प्रकारांनी होतो. प्रकाशाच्या साक्षात्काराचे विविध प्रकार या पदात कोटणीसमहाराजांनी सांगितले आहेत. मातीत म्हणजे देहात ईश्वर माणिक रूपाने म्हणजे लाल रंगाच्या प्रकाशात प्रगट होतो. मातीत म्हणजे देहामध्ये हिऱ्याप्रमाणे पांढऱ्या शुभ्र रंगाचा साक्षात्कार होतो. मातीत/देहात मोत्याप्रमाणे पिवळट/पांढरट रंगाच्या प्रकाशरूपाने परमेश्वराचे दर्शन होते. मातीरूप देहामध्ये मनाला मोह पाडणाऱ्या (मोहन) माळेच्या रूपात ईश्वर दिसतो. मातीरूप देहात तारा या स्वरूपात तारक ब्रह्माचा साक्षात्कार होतो.

चिमड संप्रदायातील अन्य साधूंनीही असेच साक्षात्कार सांगितले आहेत. उदा. मग पाहता दिसती मोती। माणिकांचे घोस लोंबले। मोतीचूर फेकियेले।। (दासराममहाराज); तारे चकाकती आनंद तो किती। (दासराममहाराज); रंग उसळती नाना ज्योती। (दासराममहाराज); हंस गगनीच्या मुक्तामाळा देई आणुनी हाती। अगणित तारे त्यात चमकती नाना रंग ज्योती ।। (कोटणीसमहाराज); नीलं धवलं श्यामं अभिनव नवरंगं। (चिमडमहाराज).

नंतर कोटणीसमहाराज म्हणतात :- या मातीत/देहात असताना जीवाने जर हे ब्रह्म साक्षात्कार अनुभवले नाहीत तर त्याचा जन्म फुकट जाणार आहे.

आता प्रश्न असा :- देहात ब्रह्म साक्षात्कार होण्यास काय करावयास हवे? याचे उत्तर कोटणीसमहाराज असे देतात :- मी साक्षात्कारी गुरु केला. त्याने सांगितलेले तत्त्वरूप/गतिरूप नाम मी अभ्यासले. त्या नामाचा परिणाम म्हणून मला या देहातच निरनिराळ्या प्रकारांनी ईश्वराचा साक्षात्कार झाला. आणि आता मी या मातीतच/देहातच जीवन्मुक्त स्थितीत आनंदाने नाचत आहे.

ब्रह्मानंद झालेला पुरुष आनंदाने उड्या मारतो. तेव्हा कोटणीसमहाराजांप्रमाणे इतर जीवांनीही केले तर तेही जीवन्मुक्त होऊन ब्रह्मानंदात डोलत राहतील.

■ ■ ■

# ८

# कीर्तन भक्ति

देहाच्या उपाधीअंती जीव स्वतःचे मूळ ब्रह्मरूप विसरून गेला आहे. ते त्याला प्राप्त व्हावे यासाठी संतांनी ''धरा भक्ति मार्ग चोख'' असे कथन केले आहे. भागवत पुराणाने भक्तीच्या नऊ प्रकारांत कीर्तन भक्ति सांगितली आहे. कोटणीसमहाराजांनी तब्बल दोन तपे – चोवीस वर्षे – नित्य कीर्तन केले. साहजिकच या हरिकीर्तनाचा महिमा त्यांनी सांगितला असेल तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. तबला/मृदंग, पेटी, झांज यांच्या साथीसह होणारे कीर्तन हे बाह्य होय. अंतरंगातील कीर्तन म्हणजे 'अखंडित वाचे श्रीराम स्मरण' असे आहे. या अंतरंग कीर्तनाबद्दल कोटणीसमहाराज सांगतात :-

**कीर्तनगुणे होता सप्रेम । प्रेमरंगी मेघश्याम ।।**
**मेघश्यामा ठायी विश्राम । पावती ते संत ।।१।।**
**संत तेथे पूर्ण ज्ञान । ज्ञान तेथे आनंदघन ।।**
**आनंद तेथे समाधान । समाधानी सुख ।।२।।**
**सुख तेथे असे समाधी । समाधी तेथे तुटली आधी ।।**
**आधि तुटल्या जीव उपाधी । नुरेचि शोधिता ।।३।।**
**उपाधि तुटता होता अभेद । अभेद तेथे पूर्ण बोध ।**
**बोध तेथे ब्रह्मानंद । ठसावे परिपूर्ण ।।४।।**
**ऐसा कीर्तनाचा महिमा । जाहली बोलायाची सीमा ।।**
**रामकृपेने परमात्मा । जोडला *दासाला* ।।५।।**

प्रेम ही माणसाची एक मूलभूत भावना आहे. माणूस अनेक गोष्टींवर प्रेम करीत असतो. ईश्वरावरील प्रेम म्हणजे भक्ति आहे. या भक्तीने जर ईश्वराचे गुण गाइले, त्याचे नामस्मरण केले, तर तेच कीर्तन होईल. नामस्मरण हेच कीर्तन असे कोटणीसमहाराजांचे म्हणणे आहे.

भक्तीने जे कीर्तन होते, त्या कीर्तनाच्या भक्तीप्रेमाच्या आनंदात मेघश्याम/राम/परमेश्वर प्रगट होतो. या मेघश्याम रामाच्या ठिकाणी म्हणजे त्याच्या दर्शनामुळे साधुसंतांना विश्रांति मिळते. जेथे साधुसंत असतात म्हणजे साधुसंतांचे अंतरंगात/अंतःकरणात रामाचे संपूर्ण ज्ञान असते. ईश्वर हा आनंदरूप असल्याने, ईश्वराचे ज्ञान होताच तेथे घनदाट आनंद असतो. जेथे ईश्वरी आनंद असतो तेथे मनाला संपूर्ण समाधान प्राप्त होते. असे समाधान झाले की मन हे सतत सुखात रहाते; त्याचे ठिकाणी दुःखाचा लवलेशही येत नाही. आता जेथे सतत सुख असते तेथे समाधि असते. समाधीत सुखप्राप्ति होते; म्हणून जेथे सुख असते तेथे समाधि असते असे म्हटले आहे. ईश्वराच्या दर्शनाने अशी समाधि प्राप्त झाली असता, जीवाच्या आधि म्हणजे मानसिक दुःखे नष्ट होतात. वर्तमान जीवनात जीव हा देहात आहे. देह ही जीवाची उपाधि आहे. या उपाधीतून बाजूला होऊन आधि संपल्या की देह ही उपाधि रहात नाही म्हणजे ती निष्प्रभ/निरुपयोगी होते, ती त्रासदायक रहात नाही. म्हणजे जीव हा देहाच्या उपाधीतून अलग होतो म्हणजे देहाला मी असे मानण्याची त्याची वृत्ति संपते.

देहाच्या उपाधीमुळेच माणसाला स्वतःच्या ब्रह्मरूपाचे/सुखरूपाचे विस्मरण झालेले आहे. हे विस्मरण दूर झाले की जीव हा ब्रह्माशी/अंतरात्म्याशी एकरूप होऊन जातो. असा अंतरात्म्याशी/ईश्वराशी अभेद प्राप्त झाला की तेथे ईश्वराचे पूर्ण ज्ञान प्रगट होते. ब्रह्माचे असे पूर्ण ज्ञान झाले की तेथे पूर्ण ब्रह्मानंद प्रगट होतो.

अशाप्रकारे कीर्तनाने ब्रह्मानंद प्राप्त होतो. अशा या कीर्तनाचे वर्णन शब्दांनी किती आणि कसे बरे करता येईल? कीर्तनाने ब्रह्मानंदाची प्राप्ति येथेच बोलण्याची समाधि होते. इतके सांगितल्यावर, कोटणीसमहाराज म्हणतात :- माझे गुरु जे राम म्हणजे चिमडमहाराज, त्यांच्या कृपेने मला परमात्मा भेटला आणि मग मी सहजपणेच आत्मानंदात/ब्रह्मानंदात निमग्न होऊन गेलो.

■ ■ ■

# १

## कीर्तनाची महती

हरिकीर्तनाचा महिमा फार मोठा आहे. त्याचे वर्णन कोटणीसमहाराज एका पदात करतात. कीर्तनात जीव-शिवाची भेट होऊन जीवाला ब्रह्मानंद होतो. हे सांगताना त्यांनी मन, जीव, शिव इत्यादीवर स्त्रीचे रूपक केले आहे. आणि ते त्यांनी मनाला सांगितले आहे :-

**स्थिर स्थिर होई मनुबाई । हरिकीर्तनी सावध होई ।।ध्रु।।**
**काय सांगू तुझ्या संगतीने । नरजन्मा आणिले उणे ।**
**एक विषय सेवन करणे । यापरते काहीच नेणे।**
**परमार्थ विषापरी वाटे । चौमुक्ती जोडती जेणे।**
**पुरे पुरे तुझे नाचणे आता । किती गाजविसी मजवरी सत्ता ।।**
**साधी आधी काही परमार्था । हरिनामी स्वस्थचि राही ।।१।।**
**कीर्तन संतरायाचे । परमार्थ तत्त्वबोधाचे ।**
**सांगणे बहुत प्रेमाचे । प्रासादिक गुरुभक्तीचे ।**
**आदरे ऐकती साचे । धन्य भाग्य त्या लोकांचे ।**
**देव कीर्तनात प्रगटला । जेथे तेथे पाहता भरला ।**
**असा अनुभव कोठे न आला। तनु पुलकित जेथे होई ।।२।।**
**हरिकथा गोड बहु झाली । वाचे न बोलवे बोली।**
**भाग्यवंत मंडळी बसली । अशी शोभा कोठे न दिसली।**
**स्वारी सद्गुरूची आली । चित्तवृत्ति तल्लीन झाली ।**
**जीऊबाई कीर्तना आली । शिऊबाई तिजसी भेटली ।**
**मनुबाई निवांत ठेली । *दासा* प्राप्त झाली गुरुपायी ।।३।।**

कोटणीसमहाराज मनरूपी स्त्रीला सांगतात :- हे मना, इंद्रियांच्या मागे लागून

विषयांत गुंतून रहाणे हेच तुला माहीत आहे. या तुझ्या विषयासक्तीमुळे तुला परमार्थ म्हणजे परमेश्वराकडे जाणायाचा मार्ग हा विषाप्रमाणे आवडत नाही. आणि तू माझ्यावर हुकमत गाजवत असल्याने, माझे नुकसान होत आहे. तुझ्या संगतीने माझा नरजन्म वाया जात आहे. तेव्हा हे मना, आता तू विषयाकडे धावणे बंद कर. आणि ज्या परमार्थाने चार मुक्ति - सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता- प्राप्त होतात, त्या परमार्थाकडे वळ. तुझ्यामुळे जर मला परमार्थ साधला तर माझ्या जीवनाचे सार्थक होईल. तेव्हा हे मना, ज्या संकल्पविकल्पामुळे तू चंचल/अस्थिर होतोस, ते संकल्प विकल्प बंद कर आणि स्थिर/निश्चल हो. आणि निश्चळपणे परमार्थाकडे लक्ष दे.

मग मन प्रश्न करते :- मी परमार्थाकडे वळावे म्हणजे काय करावे? या प्रश्नाला कोटणीसमहाराज उत्तर देतात :- संत श्रेष्ठ असे माझे सद्‌गुरू कीर्तनभक्ति करतात. त्यामध्ये ते सांगतात :- परमार्थात ब्रह्म हे अंतिम तत्त्व आहे. ब्रह्माचे ज्ञान होण्यास ''हरिनाम'' हा उपाय आहे. अरे मना, ते तू सर्व ऐक आणि ठसवून घे. ते प्रेमाने बोध करतात. त्यात ते गुरुभक्तीचे आणि गुरुनामाचे महत्त्व सांगतात. ते सर्व पटण्यासारखे आहे.

यावर प्रश्न असा :- या कीर्तनाचे काय महत्त्व आहे? त्याचे उत्तर असे:- हरिकीर्तनात देव प्रगट होतो आणि तो सर्वत्र दिसू लागतो. असा अनुभव कीर्तनाखेरीज अन्यत्र कुठेही येत नाही. देवाच्या दर्शनाने आनंद होऊन अंगावर रोमांच उभे राहतात.

हे हरिकीर्तन फार गोड आहे. म्हणजे जिभेला त्याचा गोडवा कळत नाही तर श्रवणाला आणि मनाला त्याची गोडी कळते. या कीर्तनाचे महत्त्व शब्दांनी सांगता येण्यासारखे नाही.

हे हरिकीर्तन ऐकण्याला भाग्यवान् लोक जमले आहेत. असे श्रोते आणि योग्य कीर्तनकार असे दृश्य व त्या दृश्याची शोभा अवर्णनीय आहे आणि तशी अन्यत्र कुठे दिसत नाही.

या कीर्तनाला सद्‌गुरूंची स्वारी आलेली आहेच. त्यांचे ठायी चित्ताची वृत्ति तल्लीन झाली. जीवरूपी स्त्री आणि शिवरूपी स्त्री या कीर्तनाला आली. जीव



शिवाला भेटला. ''जीवाने शिवाला पहाणे यातच परमार्थाचे सार आहे.'' असा परमार्थ साध्य झाला की मनातले संकल्प विकल्प दूर होऊन, मन शांत आणि समाधानी होते. गुरूच्या पायी शरण गेल्याने, गुरूच्या कृपाप्रसादाने, असे कीर्तन घडून, मन तृप्त/समाधानी झाले, मनाची धडपड आणि तडफड संपली. मन हे अमन म्हणजे उन्मन झाले. परमार्थात हीच उन्मन अवस्था साधावयाची असते. ती हरिकीर्तनाने साध्य होते.

हरिकीर्तन म्हणजे अखंड वाचेने नामस्मरण, असे कोटणीसमहाराजांनी अन्यत्र सांगितले आहे, साहजिकच असले कीर्तन म्हणजे नामस्मण; ते अंतरंगात आहे हे सांगणे नकोच.

■ ■ ■

**१०**

# परमार्थातील ब्रह्मजन्म

हिंदूंची धर्मशास्त्रे व्यवहारात माणसांवर कोणते संस्कार करणे जरुर आहे ते सांगतात. त्यात मुंज अथवा उपनयन हा एक संस्कार आहे. उपनयनानंतर माणसाचा दुसरा जन्म होतो असे मानले जाते. त्यामुळे 'द्विज' असा शब्द रूढ झाला. आईच्या उदरातून या जगात येणे हा पहिला जन्म. उपनयनानंतर विद्याप्राप्तीसाठी दुसरा जन्म होतो. व्यवहारात माणसाचे असे दोन जन्म मानले जातात. परमार्थातही माणसाला दोन जन्म आहेत. ते कसे आणि कोणते हे कोटणीसमहाराजांनी पुढील अभंगात सांगितले आहे :-

**सद्गुरूवचने ब्रह्मजन्म हा मायाजठरीहुनी ।**
**काढी वेगळे मज लागूनी अगाध ही करणी ।।ध्रु।।**
**शांति क्षमा दया कामिनी येती माझे जन्मकाळी।**
**अनुहात ध्वनि झेंगट पिंटिले बोलती वेल्हाळी ।।१।।**
**बहु भाग्याचे मूल जन्मले आप रूप लक्षणी ।**
**सोहंपणाने कैसे पाहते बालक हे नयनी ।।२।।**
**पायाळू हे मूल जन्मले पाहे गुप्त ठेवा ।**
**अविद्येचे दुःख हरपले लाभ मोठा जीवा ।।३।।**
**चिद्रत्नांच्या अंजुळी धरुनि बाप माझा झाला ।**
**मधु लावीतो स्वानंदाचा मुखासी निज लीला ।।४।।**
**कल्पना ही रात्र सटवीची निरसिली बघ कैसी ।**
**ज्ञानदीप लावुनी ब्रह्मस्वरूप प्रकाशी ।।५।।**
**निरालंबीच्या पालखात निज निज रे म्हणती ।**
**परिये देती श्रीगुरुनामे हल्लर पै गाती ।।६।।**
**अनेक जन्मे फिरुनिया तू भागलासी बाळा ।**
**निज स्वरूपी ऐक्य होय तू बोलती *दासाला* ।।७।।**



ब्रह्म हे परमार्थातील अंतिम सत्य तत्त्व आहे. त्याला माया ही उपाधि येते. ब्रह्माच्या अधिष्ठानावर माया ही आपल्या विक्षेप शक्तीने विश्वाचा भास निर्माण करते. या विश्वात पंचमहाभूतांपासून बनलेले अनेक स्थूल देह उत्पन्न होतात. त्यांतील एका देहाची उपाधि ब्रह्माला आली की जीव ही संकल्पना येते. याचा अर्थ असा की परमार्थदृष्ट्या मायेमुळे जीव ही संकल्पना येत असल्याने, तो जीवाचा पहिला जन्म ठरतो. पुढे कर्माअंती जीव अनेक देहांत जात असतो, तो जन्ममरणाच्या सापळ्यात अडकतो. या जन्ममरणाच्या येरझाऱ्यांतून सुटण्यासाठी जीवाने एका ब्रह्मसाक्षात्कारी गुरूचा आश्रय घेतला. गुरूने त्याला परमार्थाचे वर्म सांगितले. ''अरे जीवा, ज्या देहाला तू मी म्हणत आहेस तो देह हे तुझे खरे स्वरूप नसून तू प्रत्यक्ष ब्रह्म आहेस. ब्रह्म हे तुझे मूळचे खरेखुरे स्वरूप आहे.'' त्यावर जीवाने पृच्छा केली ''माझे मूळ ब्रह्मस्वरूप मला कसे प्राप्त होईल?'' त्यावर सद्गुरूने त्याला सहज नामाचा/सोहंनामाचा/अजपा नामाचा उपाय सांगितला. तो उपाय केल्यावर, जीव हा ब्रह्मरूप होऊन जीवन्मुक्त झाला. जीवाची ही जीवन्मुक्त स्थिति हाच त्याचा परमार्थातील दुसरा जन्म होय. याला या अभंगात ब्रह्मजन्म असे म्हटले आहे.

या अभंगात कोटणीसमहाराज माणसाच्या लौकिक जन्माकडे वळून, पहिल्या जन्माचे वेळी जे काही घडले, तसे या पारमार्थिक जन्माच्या वेळी काय घडते, ते सांगत आहेत.

ब्रह्माधिष्ठित मायेतून होणारी जीवाची संकल्पना हा त्या जीवाचा पहिला जन्म. मग सद्गुरूकृपेने तो जीव ब्रह्मरूप होतो, हा त्याचा पारमार्थिक दृष्ट्या दुसरा जन्म. या जन्माचे वेळी असे घडते, असे कोटणीसमहाराज सांगतात :-

आताचा माझा हा जन्म निराळा/वेगळा जन्म झाला. हा जन्म सद्गुरूंच्या कृपेमुळे झाला. म्हणून ही सद्गुरूंची करणी आहे. सद्गुरुंची करणी अगाध आहे. तिचे वर्णन करणे हे शब्दांच्या पलीकडचे काम आहे.

लौकिक व्यवहारात मुलाला पाळण्यात घालून नंतर त्याचे नांव ठेवले जाते. त्यावेळी अनेक सवाष्ण बायकांना बोलावले जाते. त्याप्रमाणे जीवाच्या या दुसऱ्या जन्माच्या संदर्भात दया, क्षमा आणि शांति या स्त्रिया गोळा होतात. (हेच गुण या मुलाच्या अंगी आहेत). मुलाचे नांव ठेवण्याचे वेळी काही वेळा वाजंत्री, बँड

इत्यादि लावले जातात. या दुसऱ्या जन्माच्या प्रसंगी नाजूक गोड गोड बोलून, अनुहात नादरूपी झंगट वाजविले जात आहेत. (ब्रह्मसाक्षात्काराच्या वेळी मुलाला अनाहत नाद ऐकू आला होता). लौकिकात मूल कुणाप्रमाणे दिसते हे सांगितले जाते. या दुसऱ्या जन्माच्या वेळी असे सांगितले जाते :- आत्म्याचे रूप धारण करणारे म्हणजे आपले मूळ रूप धारण करणारे हे बालक आहे. ते अतिशय भाग्यवान् आहे. ब्रह्मरूप होणे हे भाग्याचे लक्षण आहे. या बाळाच्या डोळ्यात ''सोहं'' दिसते (= हे मूल तो ईश्वर मी आहे (सः अहं) असे म्हणत आहे).

हे मूल पायाळू आहे. लौकिक व्यवहारात अशी कल्पना आहे की पायाळू माणसाला जमिनीत गाडून ठेवलेला गुप्त धनाचा ठेवा दिसत असतो. या मुलाला आत्मरूपी गुप्त धनाचा ठेवा गवसला आहे (हे बाळ आत्मरूप होण्यापूर्वी आत्मा गुप्त होता). लौकिकात धन बाहेर काढताना जमिनीवरील माती इत्यादि बाजूला काढली जाते. त्याप्रमाणे या मुलाने अविद्येच्या/अज्ञानाच्या आवरणाखाली दडलेले आत्मधन घेताना, अविद्या/अज्ञान दूर केले आहे. त्यामुळे त्याचे अविद्याजन्य दुःख दूर झाले आहे.

लौकिक व्यवहारात नवीन जन्मलेल्या मुलाला मधाचे बोट चाटविले जाते. या दुसऱ्या जन्मीच्या नूतन बालकाला त्याचा पिता मधाचे बोट चाटवीत आहे. येथे पिता आहे परमेश्वर. तो चैतन्यरूपी रत्नांच्या प्रकाशस्वरूपात प्रगट झाला. चिद्रूप रत्ने हीच कोणी त्याची बोटे. त्या बोटांच्या द्वारा तो स्वानंदरूपी मध मुलाच्या तोंडात घालत आहे. (चिद्रत्नाच्या रूपात जीवाला साक्षात्कार झाला आणि त्याला स्वानंदरूपी मध चाटण्यास मिळाला).

या जगात लौकिक व्यवहारात, मुलाच्या जन्मानंतरच्या सहाव्या दिवशीच्या रात्री, मुलाला त्रास होऊ नये म्हणून, सटवी नामक देवीची पूजाअर्चा केली जाते. दुसरा जन्म घेतलेल्या जीवाच्या बाबतीत कल्पनारूपी सटवीची रात्र संपलेली आहे (मुलाला आता कोणत्याही कल्पनेची बाधा होत नाही).

व्यवहारात बारश्याच्या वेळी दीप-प्रज्वलन केले जाते. परमार्थात या मुलाच्या संदर्भात आत्मज्ञानरूपी/ब्रह्मज्ञानरूपी दीपाचे प्रज्वलन करण्यात आले आहे (ज्ञान हे प्रकाशरूप मानले जाते. मुलाला ब्रह्मज्ञान झाले आहे).



लौकिक व्यवहारात मुलाला पाळण्यात ठेवून, ''बाळा जो जो रे'' (बाळा, तू झोपी जा) असे म्हटले जाते. दुसऱ्या जन्माच्या वेळी प्रत्यक्ष पाळणा नाही. येथे निरालंबनाच्या आलंबनात पाळणा कल्पिलेला आहे. आणि त्या मुलाच्या गुरूचे नाव घेऊन, तेथे जमलेल्या दया इत्यादि स्त्रिया गाणे म्हणीत आहेत. कारण गुरूच्या कृपाप्रसादानेच एका जीवाचा हा दुसरा जन्म झाला आहे. नंतर त्या स्त्रिया या बाळाला म्हणतात :- ''हे बाळा, आता तुला तुझे मुळचे स्वतःचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्या स्वतःच्या निजरूपातच तू आता कायम रहा.''

अशाप्रकारे या अभंगात कोटणीसमहाराजांनी परमार्थदृष्ट्या होणाऱ्या जीवाच्या दुसऱ्या जन्माच्या संदर्भात अनेक गोष्टी सांगितल्या आहेत.

■ ■ ■

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| | | |
|---|---|---|
| १. | मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र | १९४० |
| २. | श्रीज्ञानदेवतेहत्तिशी, सानंद टीकेसह व तात्पर्यार्थासह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ. | १९५२ |
| ३. | श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह आणि ज्ञानेश्वरी सार | १९६८ |
| ४. | वायुलहरी व श्री ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ ) | १९६९ |
| ५. | ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह | १९७१ |
| ६. | श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह | १९७२ |
| ७. | श्रीनारायणरावमहाराज यरगट्टीकर चरितामृत | १९७३ |
| ८. | श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र | (सन नाही) |
| ९. | श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह ) | १९७४ |
| १०. | श्रीज्ञानेश्वरस्तोत्र | १९७५ |
| ११. | सिद्धस्तुती | १९७७ |
| १२. | अमृतानुभव-मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह | १९७९ |
| १३. | तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र | १९८३ |
| १४. | श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र | (सन नाही) |
| १५. | गुरुपाठ | १९८४ |
| १६. | सांप्रदायबोध | १९८४ |
| १७. | श्रीरामपाठामृत | १९८४ |
| १८. | बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र | १९८४ |
| १९. | श्रीएकनाथी भागवत - संक्षिप्त पाठस्तोत्र | १९८७ |
| २०. | नित्यपाठामृत | १९८७ |
| २१. | संजीवनपाठ | १९८७ |
| २२. | श्रीदासरामवचनामृत | १९८७ |



## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| | | |
|---|---|---|
| २३. | नासदीयसूक्त, भावार्थ संगति | १९८८ |
| २४. | श्रीगोविंददर्शन | १९८८ |
| २५. | सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत | १९८८ |
| २६. | श्रीदासरामगाथा | १९८८ |
| २७. | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण | १९८९ |
| २८. | श्रीगुरुमहिमा | १९९१ |
| २९. | श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ | १९९७ |
| ३०. | श्रीरामदासबोध | १९९७ |
| ३१. | श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला | १९९९ |
| ३२. | परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यारगट्टीकरांच्या चरित्रासह) | २००२ |
| ३३. | परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पहिली व दुसरी | २००२ |
| ३४. | आरती संग्रह | २००२ |
| ३५. | चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ | २००२ |
| ३६. | हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ३७. | श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | २०१० |
| ३८. | अनुभवामृत सम-ओवी-टीकेसह | २०१० |
| ३९. | परमार्थ प्रश्नोत्तरी (आवृत्ती तिसरी) | २०१० |
| ४०. | आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २०१० |
| ४१. | ग्रंथत्रयी | २०११ |
| ४२. | उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २०११ |
| ४३. | सद्‌बोध दशक | २०११ |
| ४४. | श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध | २०११ |